# मराठीसृष्टी डॉट कॉम

## मराठीतील सर्वकाही...... एकाच छत्राखाली

## www.marathisrushti.com

## मराठीसृष्टी वेबपोर्टलविषयी
## संपूर्ण माहिती आणि
## आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे



# मराठीसृष्टी डॉट कॉम

www.marathisrushti.com

## ठळक वैशिष्ट्ये

- दररोज ८०,००० हून जास्त वाचक
- ४,५०,००० हून जास्त नोंदणीकृत सभासद
- २० वर्षाहून अधिक काळ कार्यरत.
- लवकरच मराठीतील क्र. १ च्या स्थानाकडे वाटचाल
- नेटवर्कची एकूण वाचकसंख्या दररोज २००००० हून अधिक
- २४ तास कार्यरत असलेला संपादकवर्ग
- तांत्रिकदृष्ट्या भक्कम पायावर उभे. वृत्तपत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांनी युक्त
- लेखसंग्रह, मराठी व्यक्ती संदर्भ कोश, खाद्ययात्रा, महासिटीज, मराठी व्हिडिओज, मराठी आडनावकोश असे विविध विभाग
- जगाच्या कानाकोपऱ्यातून येणारा नियमित वाचकवर्ग. वाचकसंख्येत सतत भर
- वाचकांना त्यांच्या प्रतिक्रिया तात्काळ लिहून ऑनलाईन पाठविण्याची सोय
- लाखांहून अधिक मराठी लेखांचा संग्रह असलेले एकमेव मराठी संकेतस्थळ
- लेखांमध्ये दररोजची भर.
- प्रतिथयश साहित्यिकांपासून सामान्य माणसापर्यंत अनेकांचे लेखन उपलब्ध
- आपले मत स्पष्टपणे मांडण्याची सोय. कोणत्याही प्रकारची सेन्सॉरशीप नाही.
- लेखनासाठी अत्यंत सुटसुटीत नियम व अटी
- लेखनासाठी लेखांच्या विषयानुसार २५ हून अधिक विभाग. नवीन वर्गवारी बनविण्याची सोय.
- मराठी व्यक्ती संदर्भ कोश हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प
- जाहिरातदारांना विविध प्रकारच्या जाहिरात संधी
- परिपूर्ण ब्लॉग इंजिन व्यवसायासाठी उपलब्ध
- लेखकांना व्यावसायिक संधी
- स्वेच्छानिवृत्तांसाठी आकर्षक व्यावसायिक योजना
- सेवानिवृत्तांसाठी आकर्षक व्यावसायिक योजना
- पत्रकारांसाठी आकर्षक योजना

# मराठीसृष्टी डॉट कॉम वर आपले स्वागत!

**मराठीसृष्टी डॉट कॉम** हे मराठी वेब पोर्टल इंटरनेटवरील एक लोकप्रिय पोर्टल आहे. मराठीसृष्टीचे सध्या ४,५०,००० हून जास्त नोंदणीकृत सभासद आहेत. दररोज सुमारे ८०,००० वाचक या पोर्टलला भेट देत असतात.

- विविध विषयांवरील हजारो लेखांचा समावेश असलेला आणि सतत वाढत जाणारा "**मराठी लेखसंग्रह**"
- वेगवेगळ्या क्षेत्रातील मराठी माणसांची माहिती संकलित करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देणारा "**मराठी व्यक्ती संदर्भ कोश**"
- महाराष्ट्राची माहिती देणारा **महासिटीज – ओळख महाराष्ट्राची** हा विभाग
- भारतातल्या विविध शहरांची माहिती करुन देणारा **महासिटीज – ओळख भारताची** हा विभाग
- जगभरातल्या विविध शहरांची माहिती करुन देणारा **महासिटीज – ओळख जगाची** हा विभाग
- मराठी आणि अमराठी खाद्यपदार्थांची माहिती करुन देणारा **गावोगावची खादययात्रा** हा विभाग
- मराठीतील ५०,००० पेक्षा जास्त आडनावांचा परिचय करुन देणारा **आडनावांच्या नवलकथा** हा खास विभाग
- इंटरनेटवरील मराठी व्हिडिओज एकाच ठिकाणी उपलब्ध करणारा **मराठी व्हिडिओज** हा विभाग
- नियमित **आरोग्यविषयक** सदरे

असे लोकप्रिय विभाग ही मराठीसृष्टीची खासियत. याशिवाय २०१७ मध्ये आणखी काही खास विभाग पोर्टलवर येत आहेतच.

या वेब पोर्टलवर आपण आपल्याला हव्या त्या विषयावर, हवे ते, हवे तेव्हा, हवे तेवढे लिहू शकता. आपल्या लेखामध्ये आपण चित्रे, छायाचित्रे, व्हिडिओ आणि ऑडिओ वगैरेचाही समावेश करु शकता. म्हणजेच पारंपारिक लेखन माध्यमांच्या पलिकडे जाऊन आपण काम करु शकता.

फेसबुक आणि WhatsApp या माध्यमांवर लेखन करणाऱ्या लेखकांसाठी एक महत्त्वाची गोष्ट सांगायचेय. WhatsApp या समाजमाध्यमात लिहिलेले लेख गुगलद्वारे तर शोधता येत नाहीतच पण WhatsApp वरही काही दिवसांनी शोधायचे म्हटले तर शक्य होते का याचा अनुभव आपण घेतलेलाच असेल. सध्या अनेक ग्रुप्सवर दिवसाला १००-२०० मेसेजेस येतात. त्यामुळे एक-दोन दिवस WhatsApp बघितलं नाही तर आधीचे मेसेज शोधून वाचणं फारच कठीण होतं.

हीच अडचण फेसबुकवरही येतेच. फेसबुकवरुन आलेला एखादा लेख काही काळानंतर पुन्हा बघायचा असेल तर ते महाकठीण काम आहे. गुगलवरुन तो शोधला जाईलच याची खात्री नाही. आणि लेखक माहित असला तरीही त्याच्या टाईमलाईनला जाऊन तो लेख शोधणं कटकटीचं आहेच. आता विचार करा... जर आपल्या वाचकांना आपले लेख शोधायला असा त्रास होत असेल तर आपण काय कराल?

उत्तर सोप्पं आहे. मराठीसृष्टीवर लिहायला सुरुवात करा आणि आपले लेखन वर्षानुवर्षे इंटरनेटवर जतन करुन ठेवा. कोणालाही आपले लेख गुगलद्वारे सहजपणे शोधता येऊ द्या. आपले सर्व लेखन एकाच वेब पत्त्यावर एकत्रपणे जतन करा आणि फक्त तो वेब पत्ता आपल्या मित्र-नातेवाईक-वाचकांना द्या किंवा फेसबुक आणि WhatsApp वर शेअर करा. प्रत्येक लेखासाठी वेगवेगळी लिंकही पाठवायला नको.

आपल्याला आवडलेले यु-ट्यूबसारख्या व्हिडिओ साईटवरील व्हिडिओही आपण इथे शेअर करु शकता. इतर वेबसाईटसवरील आपल्याला आवडलेल्या लेखांना आपण या पोर्टलच्या वाचकांसाठी लिंक करु शकता. आपल्याला आवडलेल्या वेबसाईटस तसेच ब्लॉगजची माहिती आपण मराठीसृष्टीच्या वाचकांना लेखाच्या स्वरुपात वेळोवेळी देऊ शकता. फेसबुक किंवा WhatsApp सारख्या सोशल माध्यमातून आलेले पोस्टस आपण येथे वाचकांसाठी शेअर करु शकता.

आपण जसे विविध विषयांवर लेख मराठीसृष्टीवर लिहू शकता तसेच आपल्या आवडीच्या विषयावर आपले नियमित सदरही इथे सुरु करु शकता. मराठीसृष्टीवर आपण आपला स्वत:चा ब्लॉगही सुरु करु शकता. यासाठी लागणारे संपूर्ण तंत्रज्ञान आणि पाठबळ आपल्याला

आमच्याकडून उपलब्ध आहे. मराठी तरुणांना, स्वेच्छानिवृत्तीधारकांना तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही रोजगारनिर्मितीच्या संधीही मराठीसृष्टीवर उपलब्ध आहेत.

मराठीसृष्टीवर आपण केलेले लेखन किमान ४,५०,००० लोकांपर्यंत पोहोचू शकते. या पोर्टलवर दररोज येणाऱ्या सुमारे ८०,००० लोकांना आपल्या ताज्या लेखांची माहिती पोर्टलच्या पहिल्या पानावरुनच मिळते. याशिवाय आमच्याकडून वेळोवेळी पाठविल्या जाणाऱ्या इ-मेल्सद्वारेही ताज्या लेखांची माहिती वाचकांपर्यंत पोहोचते.

मराठीसृष्टीवरील आपल्याला आवडलेले लेख आता आपण आपल्या फेसबुकवरील मित्रांशी शेअर करु शकता. एवढेच नाही तर ट्विटर, लिंकड-इन, गुगल प्लस आणि चक्क व्हॉटसअप वरही ते शेअर करु शकता.

आपल्याला जर इतरांपेक्षा थोडं वेगळं व्हायचं असेल.. आपली वेगळी ओळख ऑनलाईन माध्यमात करायची असेल.. तर आपल्या सर्व लेखांची यादी दाखवणाऱ्या आपल्या पानाला आपल्या आवडीच्या डोमेन नेम सहित जोडून घ्या किंवा आपला एखादा मायक्रोब्लॉग बनवण्यासाठी आमच्या टिमची मदत घ्या.

काळ, वेळ, विषय, शब्दसंख्या, वाचकवर्ग.. अगदी कशावरही कोणतंही बंधन नसलेल्या मराठीसृष्टीवर आजच लिहायला सुरुवात करा आणि आपले लेखन जगापर्यंत पोहोचवा.

**तेव्हा आता केवळ वाचकच न रहाता मराठीसृष्टीचे लेखक म्हणून आमच्याबरोबर सहभागी व्हा !**

कळावे, लोभ आहेच तो वृद्धिंगत व्हावा!

**निनाद अरविंद प्रधान**
व्यवस्थापकीय संपादक
मराठीसृष्टी डॉट कॉम

## आतील पानांवर.....


| | |
|---|---|
| लिखाणाला सुरुवात करण्यापूर्वी | ०५ |
| नोंदणी प्रक्रिया | ०५ |
| लेखक म्हणून नोंदणी करण्याचे फायदे | ०७ |
| पोर्टलवर प्रवेश करण्यासाठी ( Log In ) | ०८ |
| पासवर्डमधील बदल | ०८ |
| पासवर्ड विसरलात? | ०८ |
| लेखकाची ओळख – वाचकांसाठी आपल्या प्रत्येक लेखाच्या खाली | ०८ |
| आपल्या लेखांची वर्गवारी | ०८ |
| लेख लिहिण्यासाठी | ०९ |
| लेखनासाठी योग्य फॉन्ट आणि किबोर्डचा वापर | ०९ |
| प्रकाशित झालेल्या लेखात बदल करण्यासाठी | ०९ |
| नोंदणीकृत लेखकांना लेख लिहिण्यासाठी | १० |
| नोंदणी न करता लेख पाठवण्यासाठी | ११ |
| लेख पाठवण्याचे अन्य मार्ग | १२ |
| मराठीसृष्टीची संपादकीय व कॉपीराईटबाबत धोरणे | १३ |
| सर्वसाधारण प्रश्न | १४ |
| मराठीसृष्टीवर लेखन करण्यासंदर्भातील प्रश्न | १७ |
| मराठीसृष्टीच्या लेखकांसाठी तांत्रिक बाबींविषयी प्रश्न | २२ |
| स्वामित्त्वहक्क (कॉपीराईटस) विषयक प्रश्न | २४ |
| ब्लॉग बनविण्याविषयी प्रश्न | २६ |
| व्यावसायिक संधींविषयी प्रश्न | २७ |
| जाहिरात विषयी प्रश्न | २८ |

# लिखाणाला सुरुवात करण्यापूर्वी:

आपण जर इंटरनेटवर कोठेही लिहित नसाल तरीही मराठीसृष्टीवर लिखाण करणे आपल्याला अजिबात कठीण जाणार नाही. आपण अत्यंत सहजपणे या वेबपोर्टलवर लिहू शकाल.

आपण आपले लेखन मराठी युनिकोड फॉन्टमध्ये थेट मराठीसृष्टीवर करु शकता. जर थेट टायपिंग आपल्याला शक्य नसेल तर आपल्या संगणकावरील फाईलमध्ये टाईप केलेला मजकूर आपण येथे कॉपी-पेस्टही करु शकाल. याशिवाय आपण इ-मेलद्वारे आपल्याकडील मजकूर आम्हाला पाठवू शकाल. थोडक्यात, या पोर्टलवर लिहिताना आपल्याला तंत्रज्ञानविषयक बंधनांना सामोरे जायला लागणार नाही.

आपण मराठीसृष्टीवर लेखक म्हणून नोंदणी करुन लगेच लिहायला सुरुवात करु शकता. नोंदणी न करताही आपण Guest Author म्हणून लिखाण करु शकता. मात्र अशा परिस्थितीत आपल्याला प्रत्येकवेळी लेखासोबत आपले नाव आणि इ-मेल लिहायला लागेल. लेखक म्हणून नोंदणी करण्याचे अनेक फायदे आहेत ते पुढे बघूयाच.

नोंदणी प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. मुख्य म्हणजे नोंदणी संपूर्णत: मोफत आहे.

मराठीसृष्टीचे सध्या सुमारे ४,५०,००० हून जास्त नोंदणीकृत वाचक सभासद आहेत. आतापर्यंतच्या २० वर्षांच्या प्रवासात सुमारे ५,००० हून जास्त जणांनी लेखक म्हणून नोंदणी केली आहे. काळाच्या ओघात काहींनी लिखाण बंद केले असेल तर काही नवीन लेखक येथे आले असतील.

लेखक म्हणून नोंदणी करणाऱ्या सभासदांना वेबपोर्टलवर लिहिण्यासाठी सर्व प्रकारची मदत उपलब्ध करुन दिली जाते. मराठीत उपलब्ध असलेल्या विविध सॉफ्टवेअर सुविधांची माहिती नोंदणीकृत लेखकांना वेळोवेळी पाठविली जाते. अनेक चांगल्या सॉफ्टवेअरवर तसेच विविध विषयांवरील पुस्तकांवर नोंदणीकृत सभासदांना भरघोस सवलत दिली जाते.

युनिकोडमध्ये मराठीत टाईप करण्यासाठी सर्वसाधारणपणे सर्वच वेबसाईटसवर केवळ एखादाच किबोर्डचा पर्याय उपलब्ध असतो. मराठीत अनेक प्रकारचे किबोर्ड प्रचलित असून यांचे अजूनही प्रमाणीकरण झाले नाही. त्यामुळे ज्याला-त्याला आपल्या परिचयाच्या आणि आवडीच्या किबोर्डमध्ये काम करता यावे याची सोय मराठीसृष्टीने दिली आहे. सध्या इंग्लिश फोनेटिक, गमभन फोनेटिक, इन्स्क्रिप्ट आणि गुगल या किबोर्डद्वारे काम करण्याची सोय पोर्टलवर उपलब्ध आहे. मराठीत काम करताना कोणत्या अक्षरासाठी कोणत्या कीचा वापर करावा याची व्यवस्थित माहिती त्या त्या ठिकाणी उपलब्ध आहे. इतर वेबसाईटस आणि मराठीसृष्टी यात हाच फार मोठा फरक आहे.

ज्यांना गुगल किंवा मायक्रोसॉफ्ट ट्रान्सलिटरेशन सुविधेद्वारे मराठीत काम करण्याची सवय आहे त्यांना गमभन कीबोर्ड जवळचा वाटेल. ज्यांना गेली अनेक वर्षे प्रसिद्ध असलेल्या लोकसत्ता फॉन्टफ्रिडम तसेच आकृती वगैरे सॉफ्टवेअरमध्ये काम करण्याची सवय आहे त्यांना इंग्लिश फोनेटिक हा किबोर्ड सोपा वाटेल.

ज्यांना कोणत्याही मराठी किबोर्डची सवय नाही किंवा जे मराठीत टायपिंग करायला कधीही शिकलेले नाहीत त्यांना हे दोन्ही किबोर्ड शिकण्यासाठी केवळ दोन तास पुरेसे आहेत. मराठीत टायपिंग करायला शिकण्यासाठी सर्व प्रकारची मदतही मराठीसृष्टीवर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे आपल्याकडे असलेल्या कोणत्याही युनिकोड सॉफ्टवेअरचा वापर करुन मराठीत लिहिणेही येथे शक्य आहे. आपण जर गुगलवर उपलब्ध असलेली मराठी टायपिंगची सोय वापरत असाल तर त्याच पद्धतीने मराठीसृष्टीवरही लिहिणे शक्य आहे. अशा प्रकारे विविध किबोर्ड आणि सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मराठीत टायपिंग करण्याची सोय करुन देणारे हे कदाचित पहिले व एकमेव पोर्टल असेल.

आपल्याला युनिकोडमध्ये लिखाण करणे शक्य नसेल किंवा काही कारणाने करायचे नसेल तर त्यासाठीही उपाय आमच्याकडे आहे. आपल्याला मराठी टायपिंगचा कंटाळा असेल तरीही काळजी करण्याचे कारण नाही. आपण आपला लेख आम्हाला लिहूनही पाठवू शकता. आपण आपल्या मोबाईलवरुनही लेख पाठवू शकता. व्हॉटसअप वगैरेद्वारेही आपण आपले लेख पाठवू शकता.

## नोंदणी प्रक्रिया:

पोर्टलच्या पहिल्या पानावर तसेच **लेखसंग्रह** या विभागाच्या पहिल्या पानावर, वरच्या मेनूबारमध्ये आपल्याला **लेखक नोंदणी** साठी एक लिंक दिसेल. या लिंकवर क्लिक केल्यावर सभासदत्त्व नोंदणी फॉर्म दिसेल. या फॉर्ममध्ये आपली माहिती भरा. यामध्ये आपले नाव, आपल्याला हवा असलेला युजरनेम, इ-मेल, दूरध्वनी किंवा मोबाईल क्रमांक, वास्तव्याचे शहर आणि पिनकोड याचाच समावेश आहे.

आपल्याविषयी तसेच आपण लिहित असलेल्या विषयांविषयी थोडक्यात माहिती आपण देऊ शकता. आपल्याला एखादे नियमित सदर सुरु करण्याची इच्छा असल्यास तेही लिहू शकता. फॉर्मवरील जास्तीत जास्त माहिती भरा म्हणजे आम्हाला आपल्याशी संपर्क साधणे सोपे होईल.




हा फॉर्म सबमिट केल्यावर support@marathisrushti.com या इ-मेलवरुन आपल्याला एक इ-मेल येईल. या मेलमध्ये आपल्याला आपण नोंदणीसाठी भरलेली माहिती पाठवली जाईल. या इ-मेलला आपण फक्त Received / मिळाले असे उत्तर पाठवा. आपले मेल आम्हाला मिळले की आपला इ-मेल पत्ता validate होईल आणि आपली नाव नोंदणी पूर्ण होईल. यानंतर आपल्याला लेखक मदत-पुस्तिका आणि पोर्टलसंबंधी इतर महत्त्वाची माहिती पाठवली जाईल.

आपण नोंदणी करताना जो इ-मेल आयडी दिला असेल त्यावर जाउन असे इ-मेल आले आहे का ते तपासा. जर असे इ-मेल आपल्याला आपल्या इन-बॉक्स मध्ये मिळाले नाही तर कृपया आपल्या इ-मेल अकाउंटचे स्पॅम फोल्डर तपासा. कदाचित हे मेल आपल्या स्पॅम फोल्डरमध्ये गेले असेल. आमच्याकडून येणारी मेल नियमितपणे आपल्या मेलबॉक्समध्ये येण्यासाठी कृपया आमचा support@marathisrushti.com हा इ-मेल आयडी आपल्या मेल अकाउंटच्या व्हाईटलिस्टमध्ये नोंदवा. आमचे इ-मेल आपल्या स्पॅम फोल्डरमध्येही आले नसेल तर आम्हाला कळवा म्हणजे आम्ही हे इ-मेल आपल्याला पुन्हा पाठवू.

आपल्या इ-मेल पत्त्याचा दुरुपयोग करुन दुसऱ्या कोणी येथे नोंदणी करु नये म्हणून ही काळजी घेतली जाते. आपण आपले इ-मेल व्हॅलिडेट केल्यावर आपण मराठीसृष्टीचे लेखक म्हणून या पोर्टलवर नियमितपणे लिहू शकता.

आपण इ-मेलद्वारे नोंदणी करु शकत नसल्यास WhatsApp वरुन आम्हाला नोंदणीसाठी विनंती पाठवू शकता. अशी विनंती आल्यावर आम्ही आपल्याशी संपर्क साधू.

आपण आपल्याला हव्या त्या विषयावर लिहू शकता. लिखाणासाठी आम्ही पोर्टलवर विविध वर्गवारी तयार केलेल्या आहेत. आपला लेख आपण यापैकी कोणत्याही आणि कितीही वर्गवारींमध्ये ठेवू शकता. आपण आपला लेख लिहून सबमिट केल्यावर आमचे संपादक मंडळ तो काही काळात प्रकाशित करेल. आपल्याला अपेक्षित वर्गवारी जर उपलब्ध नसेल तर आम्हाला कळवा. आम्ही ती उपलब्ध करु देवू.

## लेखक म्हणून नोंदणी करण्याचे फायदे :

मराठीसृष्टीच्या लेखकांना नोंदणी केल्यानंतर अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. नोंदणीकृत सभासद आपल्या आवडीच्या विषयावर या साईटवर लेखन करु शकतात. नोंदणीकृत सभासदांसाठी अनेक वैशिष्टये या साईटवर आहेत. यात खालील गोष्टींचा समावेश आहे.

१. प्रत्येक लेख लिहिताना आपले नाव आणि इ-मेल लिहिण्याची गरज नाही.
२. आपल्या लेखात आपण छायाचित्रे, व्हिडिओ, ऑडिओ यांचा समावेश करु शकाल.
३. आपले सर्व लेख एका पानावरुन वाचकांना उपलब्ध होतील.
४. आपल्या प्रत्येक लेखामध्ये आपले छायाचित्र आणि ओळख दिलेली चौकट असेल.
५. वाचक आपल्याशी थेट संपर्क करु शकतील. (आपली संमती असल्यास)
६. मराठीसृष्टीद्वारे प्रकाशित केली जाणारी इ-पुस्तके आपल्याला सवलतीत मिळतील.
७. आपल्याला इ-पुस्तके बनवायची असल्यास त्यासाठी सर्व मदत केली जाईल.
८. आपल्या लेखांची माहिती आमच्या इ-न्यूजलेटरमध्ये दिली जाईल.
९. नोंदणीकृत लेखकांना त्यांची वेबसाईट अत्यल्प मोबदल्यात बनवून दिली जाईल.

## पोर्टलवर प्रवेश करण्यासाठी ( Log In ) :

मराठीसृष्टीवर लेखन करण्यासाठी आपल्याला लॉग-इन करावे लागेल. लेख वाचणे किंवा प्रतिक्रिया देणे यासाठी लॉग-इन करण्याची आवश्यकता नाही.




लॉग-इन करण्यासाठी आपण आपले युजरनेम, किंवा नोंदणी केलेला इ-मेल आयडी वापरु शकता.

## पासवर्डमधील बदल:

आपण आपला पासवर्ड केव्हाही बदलू शकता. मुख्य पानावर असलेल्या Lost Password या लिंकवर क्लिक करुन आपण आपला नोंदणीकृत इ-मेल टाईप करा. आपल्याला एक इ-मेल पाठवले जाईल ज्यात पासवर्ड बदलण्यासाठी लिंक असेल. या लिंकवर जाऊन आपण पासवर्ड बदलू शकता.

## पासवर्ड विसरलात?

आपण आपला पासवर्ड विसरला असाल तरीही काळजी करण्याचे काहीच कारण नाही. मुख्य पानावर असलेल्या Lost Password या लिंकवर क्लिक करुन आपण आपला नोंदणीकृत इ-मेल टाईप करा. आपल्याला एक इ-मेल पाठवले जाईल ज्यात पासवर्ड बदलण्यासाठी लिंक असेल. या लिंकवर जाऊन पण पासवर्ड बदलू शकता.

## लेखकाची ओळख – वाचकांसाठी आपल्या प्रत्येक लेखाच्या खाली:

मराठीसृष्टीवरील प्रत्येक लेखात लेखकाची माहिती दाखवलेली असते. आपण नोंदणीसाठी फॉर्म भरताना त्यात आपली माहिती जरुर भरावी. या माहितीच्या आधारे आम्ही आपली संक्षिप्त ओळख वाचकांना दाखवू शकू. आपल्याला आपला फोटो पाठवण्यासंबंधी सूचना आमच्याकडून मिळतील. हा फोटो .jpg फाईलच्या स्वरुपात असावा. त्याचा आकार (आडवा - width) २०० पिक्सेलपेक्षा जास्त नसावा. आपली संक्षिप्त माहिती सुमारे २५-३० शब्दांमध्ये आणि विस्तारित माहिती सुमारे १०० शब्दांमध्ये लिहून शक्यतो एखाद्या टेक्स्ट फाईलमध्ये तयार ठेवा आणि आपल्या फोटोसहित आम्हाला पाठवा.

आपल्या माहितीत दिलेला इ-मेल आयडी, फोन किंवा मोबाईल क्रमांक आपल्याला पोर्टलच्या पानावर थेट दाखवायचा नसल्यास तसे करण्याची सोय आपल्याला उपलब्ध आहे. यासाठी सूचना आपली माहिती या बॉक्समध्ये लिहा.

## आपल्या लेखांची वर्गवारी:

आपण जे लेख लिहू इच्छिता त्यांच्यासाठी योग्य वर्गवारी पोर्टलवर असेलच. मात्र आपल्याला योग्य अशी वर्गवारी न सापडल्यास आपण आम्हाला कळवू शकता. आम्ही ती वर्गवारी आपल्यासाठी तयार करु. अशी नवीन वर्गवारी तयार होईपर्यंत आपण तो लेख “इतर सर्व अवर्गिकृत” या विभागात ठेवावा. वर्गवारी तयार झाल्यावर तो तिथे नेता येईल.

## लेख लिहिण्यासाठी




आपला लेख मराठीसृष्टीवर लिहिण्यासाठी / पाठवण्यासाठी आपण लॉग-इन करणे आवश्यक आहे. त्यानंतर मुख्य मेनू मधील **“नवीन लेख लिहा”** या लिंकवर क्लिक करुन आपण लेख लिहिण्यासाठीच्या पानावर या.

आपण नोंदणीकृत लेखक असाल तर आपल्याला प्रत्येकवेळी आपले नाव आणि ई-मेल लिहावा लागणार नाही. नोंदणी न करता लेखन करणाऱ्या लेखनांना प्रत्येकवेळी नाव आणि इ-मेल टाईप करावा लागेल. नोंदणी केलेल्या लेखकांसाठी इतरही अनेक सुवुधा आहेत ज्याची माहिती इतरत्र दिली आहे.

## लेखनासाठी योग्य फॉन्ट आणि किबोर्डचा वापर

या पोर्टलवर आपल्याला युनिकोडमध्ये मराठीत लिहिण्याची सोय उपलब्ध आहे. आपण पूर्वी लिहिलेले लेख येथे कॉपी-पेस्ट करून पाठवणेही शक्य आहे.

आपले लेख ऑनलाईन थेट मराठीसृष्टीवर लिहिण्यासाठी आपल्याला चार कि-बोर्डसचा पर्याय उपलब्ध आहे. यापैकी आपल्या आवडीचा कोणताही एक पर्याय वापरा. हे पर्याय आहेत...



**१. फॉन्टफ्रिडम इंग्लिश फोनेटिक २. गमभन ३. इनस्क्रिप्ट ४. गुगल इनपुट**

यातील पर्यायावर क्लिक केल्यावर लेख लिहिण्यासाठीच्या फॉर्मवर एक गुलाबी रंगाची बॉर्डर दिसेल. याचा अर्थ मराठीत टाईप करण्याची सोय सुरु झाली आहे. मराठीमध्ये लिहिताना आपल्याला जर काही मजकूर इंग्रजीत लिहायचा असेल तर F9 ही की वापरा आणि इंग्रजीत लिहायला सुरुवात करा. पुन्हा मराठीत येण्यासाठी पुन्हा F9 दाबा.

याव्यतिरिक्त आपण विंडोजमध्ये मराठी टायपिंगसाठी दिलेली व्यवस्था किंवा बराहा, आकृती वगैरेसारख्या इतर सॉफ्टवेअरच्या युनिकोड आवृत्तीतूनही टाईप करु शकता. तसे करायचे असल्यास फॉर्मवरील इंजिन सुरु करु नका.

## प्रकाशित झालेल्या लेखात बदल करण्यासाठी :

आपल्या लेखात कोणताही बदल करायचा असल्यास त्यासाठी **“लेख संपादित करा”** या लिंकवर क्लिक करा. तेथे सूचना दिल्या आहेत.

## नोंदणीकृत लेखकांना लेख लिहिण्यासाठी :

या पानावर आपल्याला खाली दाखवल्याप्रमाणे फॉर्म दिसेल. या फॉर्ममध्ये आपण आपला लेख टाईप करु शकाल किंवा बाहेरुन कॉपी-पेस्ट करु शकाल.

आपण आपल्या लेखाचे शिर्षक, आपला लेख आणि लेखाचा सारांश हे त्या-त्या बॉक्समध्ये टाईप करु शकता किंवा कॉपी-पेस्ट करु शकता.




मात्र कॉपी-पेस्ट करण्याचा मजकूर जर MS Word File मध्ये असेल तर तेथून थेट कॉपी-पेस्ट करु नका. आधी तो Notepad मध्ये एखाद्या Text File ला घ्या आणि तेथून या बॉक्समध्ये आणा. MS Word मधील मजकूर जेव्हा आपण कॉपी-पेस्ट करता तेव्हा त्यासोबत अनावश्यक टॅग्ससुद्धा आणले जातात जे आपल्या लेखाची साईझ अनावश्यकरित्या वाढवतात. आपल्या लेखासाठी योग्य ती वर्गवारी निवडा. एकापेक्षा जास्त वर्गवारी निवडण्यासाठी Ctrl ही की दाबून पुढच्या वर्गवारी निवडा. हे जमले नाही तर खुशाल सारांश लिहिण्याच्या बॉक्समध्ये आपल्याला अपेक्षित वर्गवारी लिहा.

आपला लेख लिहून झाल्यावर शेवटच्या बॉक्समध्ये दिलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या. आणि आपला लेख पाठवून द्या.

लेख आमच्याकडे आल्यावर संपादक मंडळ तो प्रकाशित करेल. लेख प्रकाशित झाल्यावर आपल्याला त्याबद्दल कळवण्यात येईल.

आपण आपल्या लेखाची लिंक आपल्या नातेवाईक, मित्रमंडळींना जरुर कळवा आणि त्यांना लेख वाचण्यासाठी आमंत्रित करा.

## नोंदणी न करता लेख पाठवण्यासाठी :

आपण नोंदणीकृत लेखक नसाल आणि नोंदणी करण्यापूर्वी आपल्याला मराठीसृष्टीवर लेखन करायचे असेल तर आपण **अतिथी लेखक** म्हणजेच Guest Author म्हणून येथे लेख पाठवू शकता. मात्र अशा प्रत्येक लेखासोबत आपल्याला आपले नाव आणि इ-मेल लिहावे लागेल. तसेच आपले सर्व लेख एका पानावर दाखवणे वगैरेसारख्या सुविधा आपल्याला मिळणार नाहीत.

नोंदणी न करता लेख पाठवण्यासाठीचा फॉर्म खाली दाखवल्याप्रमाणे असेल. बाकी प्रक्रिया वर दिल्याप्रमाणेच असेल.



## लेख पाठवण्याचे अन्य मार्ग :

मराठीत अनेक किबोर्ड आणि फॉन्टप्रकार असल्याने आपल्यापैकी काही जणांना कोणत्यातरी विशिष्ट फॉन्टमध्ये किंवा किबोर्ड वापरुन काम करण्याची सवय असेल. अशा परिस्थितीत आपण लेख पाठविण्यासाठी खालीलपैकी कोणत्याही मार्गाची निवड करु शकता.

१. आपला लेख आपल्या संगणकावर टाईप करुन तो Copy-Paste करु शकता.

२. आपला लेख मोबाईलवर टाईप करुन तो Copy-Paste करु शकता.

३. आपल्याकडे असलेल्या कोणत्याही फॉन्टमध्ये टाइप करुन त्याची फाईल पाठवा. ही फाईल शक्यतो टेक्स्ट फाईल किंवा एम एस वर्ड ची डॉक फाईल असावी. या फाईलबरोबर लेखाची PDF फाईलसुद्धा पाठवावी.

४. लेख लिहून त्याची PDF फाईल इ-मेलने पाठवा.

५. लेख स्कॅन करुन आमच्याकडे इ-मेलने पाठवा.

६. आपला लेख पोस्टाने किंवा कुरिअरने आमच्याकडे पाठवा.

आपण आपला लेख WhatsApp वरुनही पाठवू शकता.

आपला लेख आपण आधी लिहून ठेवला असेल तर तो येथे Copy-Paste करु शकता.

आपल्याला जर मराठी टायपिंग शिकण्याची इच्छा असेल आणि आपल्याकडे कोणतेही मराठी सॉफ्टवेअर नसेल तर आपण “फॉन्टफ्रिडम” हे सॉफ्टवेअर वापरुन आपल्या संगणकावर मराठीत सहजपणे काम करु शकाल. हे सॉफ्टवेअर केवळ ५०० रुपयात मराठीसृष्टीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

आपण वापरलेल्या आकृती, श्री-लिपीसारख्या कोणत्याही मराठी फॉन्टमधून युनिकोडमध्ये लेख आणण्याची व्यवस्था आमच्याकडे आहे. आपल्यालाही आपल्या संगणकावर अशा प्रकारे फॉन्ट बदलाची सोय हवी असल्यास आमच्याकडे यासाठी फॉन्टसुविधा हे सॉफ्टवेअर सवलतीच्या दरात उपलब्ध आहे. हे एक असे जादुई सॉफ्टवेअर आहे ज्याद्वारे आपण कोणत्याही मराठी फॉन्टमधील मजकुर सहजपणे दुसऱ्या कोणत्याही फॉन्टमध्ये नेऊ शकता. मराठीतील, म्हणजेच देवनागरी लिपीतील ५५ हून जास्त प्रकारच्या फॉन्टसमधील मजकूर (आकृती, श्रीलिपी, सी-डॅक वगैरे) इकडून तिकडे नेण्याची सोय या सॉफ्टवेअरमध्ये आहे. हे सॉफ्टवेअर केवळ रु.१५००/- मध्ये उपलब्ध आहे. आपल्याला ते खरेदी करायचे असल्यास आम्हाला support@marathisrushti.com या पत्त्यावर इ-मेल पाठवा.

## मराठीसृष्टीची संपादकीय व कॉपीराईटबाबत धोरणे:

या वेब पोर्टलची रचना जितकी सोपी आहे तितकीच पारदर्शकही. या पोर्टलला संपादक मंडळ आहे मात्र कोणत्याही प्रकारची सेन्सॉरशिप नाही. संपादक मंडळाचे काम मुख्यत: सर्व लेखांच्या मॉडरेशनपुरतेच मर्यादित असते. त्याचप्रमाणे लेखांवर आलेल्या प्रतिक्रिया प्रदर्शित करणे, विविध विषयांवर स्वत: लेखन करणे, पोर्टलवरील विविध विभागांची काळजी घेणे ही संपादक मंडळाची कामे आहेत.

मराठीसृष्टीवर लिखाणाची बंधने नाहीत मात्र इथे उथळ लिखाणाला थारा नाही. वैचारिक लिखाणाचे स्वागत आहे मात्र वैयक्तिक दोषारोप, चिखलफेक यालाही थारा नाही. सर्व लेख संपादक मंडळ एकदा नजरेखालून घालते. कोणत्याही लेखात काही आक्षेपार्ह मजकूर आढळल्यास त्याबद्दल लेखकाला कळविले जाते. मजकूर बदलून पुन्हा सबमिट केल्यावर संपादक मंडळ तो प्रदर्शित करते. या प्रक्रियेमुळे काही वेळा आपण लिहिलेला एखादा लेख प्रदर्शित होण्यास वेळ लागू शकतो.

मराठीसृष्टीचे सर्व लेखक विचाराने प्रगल्भ आहेत. आम्हाला अभिमान आहे की आमच्याकडे आतापर्यंत आलेल्या हजारो लेखांपैकी अक्षरश: हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लेख आम्हाला नाकारावे लागले आहेत.

आम्हाला आणखी एका गोष्टीचा अभिमान आहे की मराठीसृष्टीवर प्रकाशित होणारे लेख वैचारिक स्वरुपाचे आहेत. कविता, वात्रटिका आणि विनोद वगळता जवळपास सर्व लेख किमान २०० शब्दांचे आहेत. एखाद्या ब्लॉग किंवा फोरम साईट किंवा सोशल नेटवर्किंग साईटवर होत असलेले १५-२० शब्दांचे उथळ लेखन मराठीसृष्टीवर होत नाही.

एखाद्या धर्माच्या, पंथाच्या, समुहाच्या किंवा देशाच्या भावनांना धक्का पोहोचवेल अशा प्रकारच्या कोणत्याही लेखनाला मराठीसृष्टीवर स्थान नाही. जातिवाचक मजकूर, बदनामीकारक मजकूर यासारख्या गोष्टींनाही इथे थारा नाही.

सध्या सोशल मिडियावरुन अनेक लेख फॉरवर्ड केले जातात. त्यामध्ये अनेकदा लेखकाचे नाव नसते किंवा लेखाच्या खाली Forwarded Post असे लिहिलेले असते. असे लेख मराठीसृष्टीवर आल्यास ते ज्यांनी पाठवले आहेत त्यांच्या नावाने प्रकाशित केले जातात. मात्र अशा लेखांच्या बाबतीत पुराव्यांसह काही तक्रारी आल्यास ते लेख येथून काढून टाकले जातात.

आपल्या लेखासाठी चित्रे, छायाचित्रे निवडताना आपण सजग रहावे. आपल्या लेखांमध्ये काही वेळा इतर वेबसाईटसवरील लेखांचा संदर्भ असल्यास त्याबाबतचे योग्य ते श्रेय त्या त्या वेबसाईटला द्यावे व त्यांचा उल्लेख करावा. काही प्रसंगी बाहेरील वेबसाईटवरील लेखांचा संदर्भ देणे आवश्यक असल्यास त्या लेखाला लिंक्स देण्यास काहीच हरकत नाही कारण इंटरनेट हे असेच एका लिंकमधून दुसरी लिंक अशाच प्रकारे बनले आहे. यामध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही.

मराठीसृष्टीवरुन बऱ्याचदा विविध वृत्तपत्रातील बातम्यांना किंवा लेखांना लिंक असतात. अशा लिंक्स देताना त्या बातमीचा किंवा लेखाचा सारांश आम्ही मराठीसृष्टीवर ठेवतो आणि त्यानंतर पूर्ण वाचन करण्यासाठी वाचकाला त्या वेबसाईटवर पाठवतो. यातही कॉपीराईटचा भंग होत नाही.

आपण मराठीसृष्टीवर लेखन करताना येथे उल्लेखलेल्या नियमांचे व्यवस्थित पालन केल्यास कोणतीही अडचणीची वेळ येणारच नाही.

कॉपीराईटच्या बाबतीत आम्ही अत्यंत जागरुक आहोत. कोणत्याही प्रकारचा कॉपीराईट भंग आम्ही सहन करत नाही. एखाद्या लेखात कोणाच्या कॉपीराईटचा भंग झाल्याचे पुराव्यासहित आमच्या निदर्शनाला आणले गेले तर तो लेख लवकरात लवकर पोर्टलवरुन काढण्याची कारवाई आम्ही करतो. मात्र तक्रार करणाऱ्याने पुरेसा पुरावा उपलब्ध करणे आवश्यक आहे. उगाचच कोणत्याही पुराव्याशिवाय आलेल्या तक्रारींना आम्ही महत्त्व देत नाही आणि अशा अशा परिस्थितीत आम्ही आमच्या लेखकांचीच बाजू घेतो.

आमचे संपादक मंडळही कॉपीराईट भंगाच्या बाबतीत नेहमीच दक्ष असते. इंटरनेटचा पसारा आणि जगभरातल्या कोट्यावधी वेबसाईटस बघितल्या तर कोणता मजकूर, चित्र, फोटो, व्हिडिओ वगैरे कोणत्या साईटवरुन उचललेला आहे काय हे तपासणे साक्षात् ब्रह्मदेवालाही शक्य नाही. एखाद्या लेखात कोणत्याही कॉपीराईटचा भंग झाल्याचे संपादक मंडळाच्या निदर्शनास आले तर त्याबाबत लेखकाला सूचना दिली जाते. अशा प्रकारचा लेख पोर्टलवरुन काढून टाकण्याचीही कारवाई केली जाते.

कॉपीराईट भंगाच्या कोणत्याही प्रकरणात मराठीसृष्टीची जबाबदारी केवळ संबंधित लेख किंवा फोटो, चित्र, व्हिडिओ वगैरे गोष्टी मराठीसृष्टी पोर्टलवरुन काढून टाकण्यापर्यंतच मर्यादित आहे. अशा प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर कारवाई कोणाकडूनही सुरु झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अशा प्रकारे कॉपीराईटचा भंग करणाऱ्या लेखकावर किंवा व्यक्तीवर असते.

## सर्वसाधारण प्रश्न

- **मराठीसृष्टी काय आहे?**
  मराठीसृष्टी हे मराठी भाषेतील एक लोकप्रिय वेब पोर्टल आहे. दररोज सुमारे ८०,००० हून जास्त वाचक या पोर्टलला भेट देतात.

- **ही वेबसाईट कधी सुरु झाली?**
  ही वेबसाईट स्वतंत्र डोमेन नेमसह २००० साली सुरु झाली. खरंतर मराठीसृष्टीची सुरुवात इंडियनलॅन्गवेजेस डॉट कॉम या पहिल्या भारतीय पोर्टलवर झाली.

  १९९५ साली इंटरनेटवरील पहिली फॉन्टआधारित मराठी वेबसाईट आणि त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान बनविणारी निनाद प्रधान यांची "सायबरशॉपी" ही संस्था आणि आकृती सॉफ्टवेअरचे निर्माते एम एस श्रीधर यांच्या संकल्पनेतून इंडियनलॅन्गवेजेस डॉट कॉम या उपक्रमाचा जन्म झाला. त्याचाच एक भाग म्हणून फेब्रुवारी १९९६ मध्ये मराठीसृष्टी या वेबसाईटची सुरुवात करण्यात आली. तेव्हा मराठीसृष्टीचं वेगळं डोमेन नेम नव्हतं. स्वतंत्र डोमेन नेम सहित ही साईट २००० मध्ये सुरु झाली.

- **मराठीसृष्टी या पोर्टलसाठी दैनंदिन संपादकीय आणि तांत्रिक बाबी कशा सांभाळल्या जातात?**
  आमचे संपादक मंडळ या पोर्टलवरील मजकूरावर देखरेख ठेवते. त्याचप्रमाणे आमचे सल्लागार मंडळ आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन करत असते. तांत्रिक बाजू तंत्रज्ञांचा गट कार्यरत असतो.

- **मराठीसृष्टीवर कोणाचे नियंत्रण आहे?**
  मराठीसृष्टीवरील लेखनाची जबाबदारी त्या-त्या लेखकाची असली तरीही संपादकीय प्रक्रियेसाठी एका संपादक मंडळाची नियुक्ती केली गेली आहे. हे संपादक मंडळ मराठीसृष्टीच्या दैनंदिन व्यवहाराची काळजी घेते.

- **मराठीसृष्टी आणि इतर मराठी वेबसाईटस यामध्ये फरक काय?**
  फरक ज्याने त्याने शोधायचा आहे. इतर वेबसाईटसपेक्षा आम्ही काहीतरी वेगळे देतोय असे आम्हाला वाटते. या साईटवरील बहुतांश लिखाण वैचारिक स्वरुपाचे आहे. लेखकांना स्वत: पोर्टलवर येउन आपले लेख लिहिण्याची सोय आहे. इथे कविता आणि विनोद वगळता इतर सर्व प्रकारच्या लेखांची शब्दसंख्या किमान २०० एवढी आहेच. इतर बऱ्याच वेबसाईटस काही विषयांवर असतात. इथे सर्वसमावेशकता आहे.

- **मराठीसृष्टीची  खास वैशिष्ट्ये काय आहेत?**
  विविध विषयांवरील हजारो लेखांचा समावेश असलेला आणि सतत वाढत जाणारा "**मराठी लेखसंग्रह**"; वेगवेगळ्या क्षेत्रातील मराठी माणसांची माहिती संकलित करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देणारा "**मराठी व्यक्ती संदर्भ कोश**";  इंटरनेटवरील मराठी व्हिडिओज एकाच ठिकाणी उपलब्ध करणारा **मराठी व्हिडिओज** हा विभाग; महाराष्ट्राची माहिती देणारा **महासिटीज – ओळख महाराष्ट्राची** हा विभाग; भारतातल्या विविध शहरांची माहिती करुन देणारा **महासिटीज – ओळख भारताची** हा विभाग; जगभरातल्या विविध शहरांची माहिती करुन देणारा **महासिटीज – ओळख जगाची** हा विभाग;  मराठी आणि अमराठी खाद्यपदार्थांची माहिती करुन देणारा **गावोगावची खादययात्रा** हा विभाग; मराठीतील ५०,००० पेक्षा जास्त आडनावांचा परिचय करुन देणारा **आडनावांच्या नवलकथा** हा खास विभाग, नियमित **आरोग्यविषयक** सदरे; मराठी जगतातील घडामोडींचा वेध आणि बातमीमागची बातमी देणारा खास विभाग; असे लोकप्रिय विभाग ही मराठीसृष्टीची खासियत. मात्र त्यापुढे जाउन वाचकांनाच थेट पोर्टलनिर्मितिच्या प्रक्रियेत सहभागी करुन घेणारे हे पोर्टल आहे.

- **मराठीसृष्टी ही सोशल नेटवर्कींग साईट आहे काय?**
  मराठीसृष्टी हे मराठी माणसाचे नेटवर्कींग करणारे पोर्टल आहे, सोशल नेटवर्कींग साईट नाही.

- **मराठीसृष्टी आणि फेसबुक वगैरेमध्ये फरक काय?**
  बराच फरक आहे. मराठीसृष्टी हे एक फोरमसदृश वेबपोर्टल आहे. यात थेट लेखांचा समावेश आहे. लेखांवर प्रतिक्रियाही आहेत. मात्र फेसबुकसारखी एकमेकांना "कनेक्ट" करण्याची पद्धत इथे नाही. कोणाच्याही प्रोफाईलमध्ये डोकावून काहीही लिहिणं यासाठी हे पोर्टल नाही.

- **मराठीसृष्टी हा ब्लॉग आहे  का?**
  मराठीसृष्टीला ब्लॉग असे म्हणता येणार नाही. साधारणपणे ब्लॉग हा एका व्यक्तीने, संस्थेने किंवा समूहाने स्वत:च्या लिखाणासाठी सुरु केलेला असतो.  इतरांचा त्यावरील सहभाग मुख्यत: प्रतिक्रिया देण्यापर्यंतच मर्यादित असतो. मराठीसृष्टी पोर्टल हे नोंदणी करणाऱ्या कोणत्याही सभासदाला लेखनाची समान संधी देणारे पोर्टल असून ते फोरम या प्रकारात मोडते.

- **ब्लॉग आणि फोरम यात फरक काय?**
  एक किंवा अनेक व्यक्ती, अनेक समूह यांचे लेखन एकाच ठिकाणी उपलब्ध करणारे आणि त्यावरील प्रतिक्रियाही उपलब्ध करणारे वेब पोर्टल असे एकाद्या फोरमचे वर्णन करता येईल.

- **इतर साईटस आणि मराठीसृष्टी यात काय फरक आहे?**
  मिसळपाव, मनोगत, मायबोली वगैरेसारख्या सर्व साईटस फोरम या प्रकारात मोडू शकतात कारण या सर्व साईटसवर अनेक लेखकांचे योगदान आहे. खरंतर आम्हा सर्व मराठी भाषिक वेबसाईट चालकांनी एकमेकांकडे प्रतिस्पर्धी या नजरेने न पाहता पूरक उपक्रम या दृष्टीने पाहिले तर नेटवरील मराठीचा प्रसार मोठ्या प्रमाणात होईल असे मराठीसृष्टीच्या व्यवस्थापनाला वाटते. यादृष्टीने इंटरनेटवरील मराठी मजकूरात जास्तीत जास्त भर पडण्यासाठी तांत्रिक सुविधा निर्माण करण्याचा मराठीसृष्टीचा प्रयत्न आहे. मराठीसृष्टीवर लेखकाला त्याच्या नावाने सबडोमेनवर सुद्धा स्वत:चा ब्लॉग तयार करता येतो. खरंतर हे सर्व पहाण्यासाठी एकदा मराठीसृष्टीला भेट द्यायलाच हवी.

- **ब्लॉगस्पॉट, वर्डप्रेस यासारख्या साईटसवर स्वत:चा ब्लॉग बनवता येतो. मग तरीही येथे कोण व का लिहिते?**
  अशा प्रकारे या दोनच काय, शेकडो ठिकाणी स्वत:चा ब्लॉग बनविता येतो. मात्र त्या ब्लॉगला किती वाचक वाचतात हे पहाणे महत्त्वाचे आहे. सर्वसाधारण पाहणीनुसार अशा ठिकाणच्या मराठी ब्लॉग्जना दिवसाकाठी तीन आकडी वाचकांचाही पल्ला गाठता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

- **ब्लॉग हा प्रकार कधी सुरु झाला?**
  ब्लॉग या संकल्पनेबद्दल आता मोठ्या प्रमाणात बोलले जाते मात्र ही काही नवी संकल्पना नाही. १९९५ पूर्वीपासून ब्लॉग या संकल्पनेसदृश वेबसाईटस कार्यरत आहेत. जुन्या पिढीतील अनेकांना जिओसिटीज डॉट कॉम ही साईट आठवत असेल. सध्याचे ब्लॉग्ज आकर्षक आहेत हे मान्य. १५-२० वर्षानंतर तंत्रज्ञानात बदल होणारच.

- **मराठीसृष्टीचा सभासद होण्यासाठी निकष किंवा पात्रता काय?**
  वेगळे काय निकष असणार? आपण मराठी आहात? अमराठी असूनही मराठीत बोलता? मराठीबद्दल अभिमान आहे? तर मग तुम्ही सभासदत्त्वाला पात्र आहात.

- **मराठीसृष्टीचे सभासदत्त्व मोफत आहे का?**
  होय. सभासदत्त्व पूर्णपणे मोफत आहे.

- **सभासद होण्यासाठी काय करावे लागते?**
  मराठीसृष्टी वेबपोर्टलवरील सभासद नोंदणी फॉर्म संपूर्णपणे भरणे आणि आम्हाला पाठवणे इतकेच!

- **सभासदत्व किती दिवसात मिळते?**
  सभासदत्त्वाचा फॉर्म भरुन नोंदणी केल्यावर आपल्याला आपले अकाउंट व्हॅलिडेट करावे लागते. यासाठी आपल्या इ-मेलवर एक व्हॅलिडेशन इ-मेल पाठविले जाते. या मेलला आपण उत्तर दिले की आपले इ-मेल व्हॅलिडेट होते आणि आपल्याला सभासद बनवले जाते. या प्रक्रियेला लागणारा वेळ हा आपल्याला व्हॅलिडेशन मेल मिळणे आणि आपण त्यावर उत्तर देणे यात लागणाऱ्या वेळावर अवलंबून असतो.

- **सभासदत्वाचा फायदा काय?**
  अनेक फायदे आहेत. आपण मराठीसृष्टी वेबपोर्टलवर लेखन करु शकता. आपल्याला विविध प्रकारच्या खास सुविधा मराठीसृष्टीकडुन दिल्या जातात. काही खास सॉफ्टवेअर आणि पुस्तकांवर विशेष सुट मिळते. मराठीसृष्टीकडून आयोजित केलेल्या उपक्रमांचे निमंत्रण मिळते. नियमितपणे मराठीसृष्टीचे न्यूजलेटर पाठविले जाते. सभासदांसाठी एक खास लकी-ड्रॉ आयोजित केला जातो. यात विजयी सभासदांना आकर्षक बक्षिसे दिली जातात. याबाबत माहिती वेळोवेळी मराठीसृष्टी पोर्टलवर दिली जाते.

- **एकाच घरातल्या एकाहून जास्त व्यक्तिंना सभासद होता येईल का?**
  एका घरातील कितिही व्यक्तिंना मराठीसृष्टीचे सभासद होणे शक्य आहे.

- **एकाच इ-मेल आयडीवर किती जणांना सभासदत्त्व घेता येईल?**
  एका इ-मेल आयडीवर एकच सभासदत्त्व मिळते.

- **सध्या मराठीसृष्टीचे किती सभासद आहेत?**
  सध्या मराठीसृष्टीचे ४,५०,००० हून अधिक सभासद आहेत. दिवसागणिक यात भर पडत आहे.

- **मराठीसृष्टीवर कोणत्या प्रकारचे लिखाण उपलब्ध आहे?**
  मराठीतील सर्व प्रकारचे लेखन मराठीसृष्टीवर उपलब्ध आहे. यादीच करायची तर चार पाने खर्च होतील. तेव्हा स्वत:च मराठीसृष्टीवर येऊन पहा ना.
- **मराठीसृष्टीच्या उत्पन्नाची साधने काय?**
  मराठीसृष्टी वेबपोर्टलच्या पानांवर दाखविल्या जाणाऱ्या जाहिराती आणि काही प्रायोजकत्त्व हेच मराठीसृष्टीच्या उत्पन्नाचे साधन. आपल्याला आपल्या व्यवसायाची जाहिरात करावयाची असल्यास तसेच आपण मराठीसृष्टीला काही मदत करु इच्छित असाल तर आमच्याशी संपर्क साधा.
- **सर्वसाधारणपणे मराठी साईटसना जाहिराती मिळत नाहीत. तुम्हाला एवढ्या जाहिराती कशा मिळतात?**
  याचे रहस्य आमच्या मोठ्या वाचकसंख्येत दडलेले आहे. जितके वाचक जास्त तितके जाहिरातदार जास्त जाहिराती देण्यास उत्सुक असतात. आम्ही बनविलेल्या आणि चालवित असलेल्या सर्व वेबसाईटस आणि वेबपोर्टल्सची एकूण दैनिक वाचकसंख्या सुमारे ३ लाखांहून जास्त आहे.

# मराठीसृष्टीवर लेखन करण्यासंदर्भातील प्रश्न

- **मी मराठीसृष्टीवर लिखाण करु शकतो का?**
अर्थात! मराठीसृष्टीची निर्मितीच मुळात आपल्याला मुक्तपणे लिखाण करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून झाली आहे.

- **मी कोणत्या विषयावर आणि कोणत्या प्रकारचे लिखाण करु शकतो?**
आपण मराठीसृष्टीवर कोणत्याही विषयावर कोणत्याही प्रकारचे लिखाण करु शकता. यासाठी वेबपोर्टलवर विविध वर्गवारी उपलब्ध आहेत. आपल्याला अपेक्षित असलेली वर्गवारी जर उपलब्ध नसेल तर आम्हाला जरुर कळवा. आपल्यासाठी ती वर्गवारी लवकरात लवकर तयार करण्याचा आम्ही प्रयत्न करु.

- **मराठीसृष्टीवर लेखन करण्यासाठी मला काही पैसे द्यावे लागतात काय?**
मराठीसृष्टीवर लेखन करण्यासाठी आपल्याला काहीही पैसे द्यावे लागत नाहीत. मराठीसृष्टीद्वारे काही व्यावसायिक संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यामध्ये सहभागी होण्यासाठी व्यावसायिक शुल्क आकारण्यात येते. हे शुल्क त्या-त्या व्यावसायिक संधीवर अवलंबून असते.

- **मी केलेल्या लिखाणाबद्दल मराठीसृष्टी मला पैसे देते काय?**
सध्यातरी मराठीसृष्टी अशा प्रकारे सर्व लेखकांना काही पैसे देत नाही.

- **लेखन करण्यासाठी नोंदणी करावी लागते का?**
मराठीसृष्टीवर लेखन करण्यासाठी नोंदणी करावी लागते. नोंदणी केल्यावर आपले अकाउंट व्हॅलिडेट करावे लागते. याबाबतची सविस्तर माहिती नोंदणी आणि व्हॅलिडेशन या विभागात दिली आहे.

- **नोंदणीची प्रक्रिया किती वेळ घेते?**
नोंदणी फॉर्म भरण्यासाठी ५ मिनिटे. नोंदणी केल्यावर आपले अकाउंट व्हॅलिडेट करावे लागते. याबाबतची सविस्तर माहिती नोंदणी आणि व्हॅलिडेशन या विभागात दिली आहे.

- **इतर लेखकांच्या लिखाणावर प्रतिक्रिया देता येते का?**
होय. मराठीसृष्टीवरील कोणत्याही लेखावर कोणीही आपली प्रतिक्रिया लिहू शकतो. प्रतिक्रिया लिहिण्यासाठी नोंदणीकृत सभासद असण्याची आवश्यकता नाही.

- **प्रतिक्रिया देण्यासाठी नोंदणीची आवश्यकता आहे का?**
प्रतिक्रिया लिहिण्यासाटी नोंदणीकृत सभासद असण्याची आवश्यकता नाही.

- **मी दिलेली प्रतिक्रिया ताबडतोब वेब पोर्टलवर दिसेल काय?**
आमच्याकडे आलेल्या सर्व प्रतिक्रिया आमच्या संपादकीय मंडळाकडून वाचल्या जातात. प्रतिक्रियांमध्ये आक्षेपार्ह काही मिळाल्यास ती प्रतिक्रिया प्रकाशित होत नाही. अशा वेळी प्रतिक्रियेच्या लेखकाला कळविले जाते.

- **माझ्याकडे एखाद्या विषयावर मोठ्या प्रमाणात माहिती किंवा लेख असतील तर नियमित सदर या स्वरुपात ते मराठीसृष्टीवर प्रकाशित करता येतील का?**
होय. आपल्याकडे अशा प्रकारचे काही लिखाण असेल तर त्याचे स्वागतच आहे. आपण मराठिसृष्टीवर आपले नियमित सदर सुरु करु शकता. नियमितपणे लेखन करणाऱ्या लेखकांसाठी मराठीसृष्टी पोर्टलच्या पहिल्या पानावरुन विशेष प्रसिद्धीची सोय केलेली आहे. त्याचप्रमाणे नियमितपणे लेखन करणाऱ्या सभासदांना त्यांच्या नावाने सब-डोमेन किंवा डोमेनही दिले जाते. नियमितपणे लेखन करु इच्छिणाऱ्या लेखकांसाठी व्यावसायिक संधीही उपलब्ध आहेत.

- **माझा स्वत:चा ब्लॉग असताना मी येथे का लिहावे?**
सर्वसाधारणपणे वैयक्तिक ब्लॉग्जना भेट देणाऱ्यांमध्ये मित्रमंडळी किंवा परिचितांव्यतिरिक्त वाचकांची संख्या फार कमी असते. आपल्या ब्लॉगला जास्त वाचकांनी भेट द्यावी अशी इच्छा असल्यास मराठीसृष्टीवर लिहिणे आपल्याला उपयोगी होईल. आपल्या लेखाबरोबर आपल्या ब्लॉगचीही लिंक असेल. मराठीसृष्टी पोर्टलला दरदिवशी किमान ८०,००० वाचक भेट देतात. त्यामुळे यातील बरेचसे वाचक आपला लेख वाचून आपल्या स्वत:च्या ब्लॉगवर बाकीचे लेख वाचायला येतील. यात आपला निश्चितच फायदा आहे.

- **माझ्या लेखामध्ये मी माझ्या ब्लॉगची लिंक देउ शकतो काय?**
  होय. आपल्या लेखामध्ये आपण आपल्या व्यक्तिगत ब्लॉगची किंवा वेबसाईटची लिंक देउ शकता. मात्र ब्लॉगवरील लेखांची थेट लिंक देता येत नाही. आपला ब्लॉग किंवा वेबसाईट व्यावसायिक असल्यास (म्हणजेच आपल्या व्यवसायासाठी त्या ब्लॉग किंवा वेबसाईटचा वापर होत असल्यास) अत्यंत नाममात्र दरात आपण आपल्या अशा ब्लॉग किंवा वेबसाईटची लिंक येथे देउ शकता. अशा प्रकारच्या लिंक्स आपल्या लेखाव्यतिरिक्त मराठीसृष्टी पोर्टलच्या इतर विभागांतही प्रदर्शित केल्या जातात.

- **मी माझ्या व्यवसायाची जाहिरात इथे करु शकतो काय?**
  निश्चितच आपण आपल्या व्यवसायाची जाहिरात मराठीसृष्टीवर करु शकता. जाहिरातींचे अनेक पर्याय आपल्यासाठी उपलब्ध आहेत. यासाठी आमचा मिडिया किट आणि दरपत्रक पहा.

- **मी माझ्या लेखामध्ये माझी स्वत:ची माहिती देऊ शकतो का?**
  मराठीसृष्टी पोर्टलवरील प्रत्येक लेखामध्ये लेखकाची माहिती आणि फोटो याचा अंतर्भाव असतोच. मात्र अशी माहिती लेखकाने पाठवल्यासच ती आम्ही अंतर्भूत करु शकतो.

- **मी माझा फोटो माझ्या लेखाबरोबर प्रदर्शित करु शकतो का?**
  होय. आपण आपल्या लेखाबरोबर आपला फोटोसुद्धा प्रदर्शित करु शकता. आपला फोटो आपल्या माहितीसोबत आम्हाला पाठवा. फोटो "जेपीजी (JPG)" फाईलच्या स्वरुपात असावा, ७५ डिपीआय च्या रिझोल्यूशन मध्ये असावा आणि फोटोची आडवी बाजू १५० पिक्सेलपेक्षा जास्त नसावी. फोटो पासपोर्ट आकारातील असावा.

- **मी मराठीसृष्टीवर लिहिलेला लेख कालांतराने इतर वेबसाईटवर प्रदर्शित करु शकतो का?**
  सर्वसाधारणपणे आपण आपले मराठीसृष्टीवर प्रदर्शित झालेले लेख इतर कोणत्याही वेबसाईटवर प्रदर्शित करु शकता. मात्र आपण आमचे आमंत्रित लेखक असाल आणि आपल्याला लेख लिहिण्यासाठी आमच्याकडून कोणत्याही प्रकारचे मानधन किंवा तत्सम कोणतेही फायदे मिळत असतील तर असे लेख इतर ठिकाणी प्रसिद्ध करण्यासाठी आमची लेखी परवानगी आवश्यक आहे.

- **माझ्या ब्लॉगवर प्रकाशित झालेला लेख मी मराठीसृष्टीवर प्रकाशित करु शकतो का?**
  होय.

- **माझा इतर वेबसाईटवर प्रदर्शित झालेला लेख मी मराठीसृष्टीवर प्रदर्शित करु शकतो का?**
  असे करणे हे त्या त्या वेबसाईटच्या धोरणाला अनुसरुन असणे आवश्यक आहे. आपण लिहिलेल्या लेखाला त्या वेबसाईटने काही मोबदला दिला असेल तर आपल्याला त्या वेबसाईटच्या चालकांची परवानगी घ्यावी लागेल. परवानगी मिळाल्याचे पत्र वगैरेची आम्हाला काहीही आवश्यकता नाही. मात्र असा लेख प्रदर्शित केल्यामुळे कोणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या कॉपीराईटचा भंग होत असेल तर त्याची संपूर्ण जबाबदारी असा लेख अपलोड करणाऱ्याची असते. सर्वसाधारणपणे मोफत ब्लॉग्जवर लिहिलेले लेख पुनर्प्रदर्शित करण्यासाठी कोणत्याही परवानगीची आवश्यकता नसते.

- **मराठीसृष्टीवरील लिखाणाला शब्दमर्यादा आहे काय?**
  कोणत्याही लेखाला शब्दमर्यादा नाही. मात्र कविता, चारोळी किंवा गझल वगैरे वगळता इतर कोणत्याही लेखात किमान २०० शब्द असावेत अशी अपेक्षा आहे. मराठीसृष्टी पोर्टलवरील लिखाण वाचकांकडून गांभिर्याने वाचले जाते. उथळ लिखाणाला येथे थारा नसल्यामुळे एखाद्या ब्लॉगवरील किंवा फेसबुक/ऑर्कुटसारखे १-२ ओळींचे लिखाण करु नये अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे केवळ आपल्या स्वत:च्या ब्लॉगला लिंक देण्यासाठी केलेले लिखाणही शक्यतो नको. लेखातील आशयाच्या आणि विषयाच्या अनुषंगाने आलेल्या कोणत्याही लिंकचे स्वागतच आहे.

- **एकाच लेखकाच्या लेखांना एका महिन्यात काही लेखमर्यादा आहे का?**
  अशी कोणतीही मर्यादा नाही. उलटपक्षी आपण जास्तीतजास्त लिहावे अशी आमची इच्छा आणि अपेक्षा आहे.

- **मला ठराविक कालावधीने सातत्याने लिखाण करावे लागेल का?**
  अशी कोणतीही अट नाही. मात्र आपण एखादे सदर चालवित असाल तर त्यासाठी आपल्याला नियमितपणे लेखन करावे लागेल.

- **एका दिवसाला मी किती लेख पाठवू शकतो?**
  कितीही!! मात्र एकाच लेखकाचे अनेक लेख सलगपणे प्रकाशित करणे संपादनाच्या दृष्टीने योग्य दिसत नाही. त्यामुळे असे लेख प्रदर्शित करताना संपादक मंडळ योग्य ती काळजी घेते आणि दोन लेखांच्या मध्ये इतर लेखकांचे लेखही प्रदर्शित केले जातात. यामुळे कदाचित आपल्याला आपले काही लेख प्रदर्शित होण्यासाठी थोडीफार प्रतिक्षा करावी लागेल.

- **माझ्या लेखामध्ये मी इंग्रजी शब्द वापरु शकतो का?**
  होय. लेखाचा विषय आणि आशय याला अनुसरुन इंग्रजी शब्द अथवा वाक्येही आपण लेखामध्ये वापरु शकता. आपल्याला लेखन संपूर्णपणे इंग्रजीत करायचे असल्यास आमच्याशी संपर्क साधा.
- **माझ्याकडे इंटरनेटची सोय नसल्यास मी लेख कसे पाठवावे?**
  आपण आपले लेख व्हॉटसअ‍ॅपद्वारेही आपले लेख पाठवू शकाल.
- **मी लेख पोस्टाने आपल्याकडे पाठवू शकतो का?**
  होय. आपण आपले लेख पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू शकता.
- **माझे लेख आपण मराठीत टाईप करुन घेऊ शकता का?**
  होय. नियमितपणे आपल्याला लिखाण करावयाचे असल्यास काही नाममात्र दरात आम्ही आपले लेख मराठीत टाईप करुन घेउ शकू.
- **आपण लेख टाईप करुन घेतल्यास मी त्यासाठी काही पैसे देणे लागतो काय?**
  टायपिंगसाठी येणारा खर्च इतक्या नाममात्र दरात आम्ही आपला लेख टाईप करुन घेउ शकतो. मात्र आपण स्वत:च मराठीत टाईप करण्याच सवय करावी अशी आपल्याला कळकळीची विनंती आहे. येणाऱ्या काळात मराठी टायपिंगची आवश्यकता नियमितपणे भासणार आहे. त्यामुळे आपण या बाबतीत स्वयंपूर्ण होणे केव्हाही चांगले. पोर्टलवर मराठीत टाईप करण्याची सोपी सुविधा आहेच मात्र आपल्याला आपल्या संगणकावर ऑफलाईन मराठीत काम करायचे असेल तर मराठीत युनिकोडमध्ये टाईप करण्यासाठी "**फॉन्टफ्रिडम**" हे सॉफ्टवेअर वापरुन पहा. हे सॉफ्टवेअर आमच्याकडे उपलब्ध आहे.
- **मी माझे लेख स्कॅन करुन इ-मेलने पाठवू शकतो का?**
  होय. स्कॅन केलेली फाईल १०० डिपीआय रिझोल्यूशनमध्ये असावी म्हणजे फाईल सुटसुटीत बनते व मेल करताना अडचण येत नाही.
- **लेख लिहिताना मी इंटरनेट चालू ठेवुनच ते लिहावे लागतात की यासाठी काही दुसरा उपाय आहे?**
  सर्वसाधारणपणे आपण कोणत्याही प्रकारे लिखाण केलेले चालते. मराठीसृष्टीवर ऑनलाईन टाईप करण्याची सोय आहेच. आपल्याला इंटरनेट चालू न ठेवता लेखन करायचे असल्यास आपण आधी आपल्या संगणकावर युनिकोड फॉन्ट वापरुन फाईल तयार करुन ठेवू शकता. या फाईलमधील मजकूर आपण कॉपी-पेस्ट पद्धतीने साईटवर देउ शकता.
- **मी माझे लेख माझ्या संगणकावर आधी टाईप करुन घेतले तर ते कॉपी-पेस्ट पद्धतीने साईटवर घेता येतील?**
  होय. मात्र एम एस वर्ड मध्ये टाईप केलेले लेख तिथून जसेच्या तसे पेस्ट केल्यास मजकूर खराब होतो. त्यामुळे असे लेख प्रथम नोटपॅडमध्ये पेस्ट करावेत आणि तिथून पुन्हा कॉपी पेस्ट पद्धतीने पोर्टलवर घ्या.
- **मला मराठी टायपिंग येत नसेल तर मी काय करावे?**
  मराठी टायपिंग शिकणे अत्यंत सोपे आहे. यासाठीची सर्व मदत मराठीसृष्टीवर उपलब्ध आहे. मराठी टायपिंग करण्याची सोय मायक्रोसॉफ्ट विंडोजच्या नव्या आवृत्तींमध्ये अंतर्भूत आहे. एक्सपी मध्ये ती आहे मात्र वेगळी सुरु करुन घ्यावी लागते. संपूर्णपणे मदत, सपोर्ट वगैरे हवे असल्यास आमच्या "**फॉन्टफ्रिडम**" या सॉफ्टवेअरचा आपण वापर करु शकता. हे सॉफ्टवेअर केवळ ५०० रुपयात उपलब्ध आहे.
- **आपल्या साईटवर उपलब्ध असलेल्या किबोर्ड (कळफलक) मधून मला टाईप करता येत नाही. मी काय करावे?**
  मराठीसृष्टी वेबपोर्टलवरील टायपिंगची सुविधा "फॉन्टफ्रिडम इंग्लिश फोनेटिक", "गमभन फोनेटिक", "इनस्क्रिप्ट" आणि "गुगल" या किबोर्ड लेआउटमध्ये उपलब्ध आहे. ज्या लेखकांना हे किबोर्ड वापरता येत नसतील त्यांना बाहेरील कोणत्याही सॉफ्टवेअरमध्ये मजकूर टाईप करण्याचीही सोय इथे आहे. यासाठी आपल्याला आपले बाहेरील फॉन्ट इंजिन (किबोर्ड ड्रायव्हर) सुरु करावे लागेल आणि मराठीसृष्टीच्या फॉर्ममध्ये टायपिंगची भाषा इंग्रजी निवडावी लागेल. आपण आकृती वापरत असाल की बराहा, आपल्याला मराठीसृष्टीवर आपले लेख लिहिता येतील. मात्र अशा कोणत्याही बाहेरच्या सॉफ्टवेअरची युनिकोड आवृत्ती वापरणे आवश्यक आहे.
- **मी इन्स्क्रिप्ट पद्धतीचा किबोर्ड वापरतो. मी काय करावे?**
  होय. मराठीसृष्टीच्या टायपिंग इंजिनमध्ये "इनस्क्रिप्ट" किबोर्ड वापरण्याची सोय आहे. त्याचप्रमाणे मायक्रोसॉफ्ट विंडोजमध्ये इन्स्क्रिप्ट पद्धतीचा किबोर्ड वापरण्याची सोय आहे. मायक्रोसॉफ्ट विंडोजमधील सोय वापरायची असल्यास मराठीसृष्टीचे टायपिसग इंजिन सुरु करु नये.

- **मी वापरत असलेला किबोर्ड आपल्या साईटवर लेख लिहिण्यासाठी वापरता येत नाही. मी काय करावे?**
  आपला लेख ऑफलाईन पद्धतीने नोटपॅड किंवा एमएस वर्डमध्ये टाईप करुन तो मराठीसृष्टीच्या बॉक्समध्ये पेस्ट करावा.

- **माझ्याकडे मराठी फॉन्ट नाहीत. मी लेख कसे लिहावे?**
  आपल्याला आपल्या संगणकावर किमान "मंगल" हा युनिकोड फॉन्ट इन्स्टॉल करुन घ्यावा लागेल. त्यानंतर आपण या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे मराठीत लेख लिहू शकाल. संगणकावर मराठीत काम करण्यासाठी मराठीसृष्टीवर उपलब्ध असलेले काही लेख आपल्याला उपयोगी होतील.

- **माझ्याकडे युनिकोड कार्यरत नाही. मी काय करावे?**
  मायक्रोसॉफ्ट विंडोजच्या सर्व नव्या आवृत्तींमध्ये "Mangal", "Arial Unicode MS" तसेच इतरही काही युनिकोड फॉन्टस उपलब्ध असतात. Windows XP मध्ये ही सोय सुरु करुन घ्यावी लागते. आपण या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे युनिकोडमध्ये मराठीत काम करु शकाल. संगणकावर मराठीत काम करण्यासाठी मराठीसृष्टीवर उपलब्ध असलेले काही लेख आपल्याला उपयोगी होतील.

- **मराठीमध्ये वेगवेगळया प्रकारचे अनेक किबोर्ड का आहेत?**
  संगणक येण्यापूर्वी रेमिंग्टन तसेच गोदरेज टाईपरायटरवर मराठीत काम केले जात असे. संगणकावर मराठीत काम करण्यासाठीचा पहिला किबोर्ड "टाईपरायटर"वर वापरला जाणारा किबोर्डच होता. त्यानंतरच्या काळात जेव्हा संगणकावर वापरण्यासाठी विविध निर्मात्यांकडून मराठी (म्हणजेच देवनागरी) फॉन्टस बनविले गेले त्यावेळी अनेक निर्मात्यांनी आपआपल्या सोयीनुसार विविध किबोर्ड बनविले होते. यात कोणतीही एकवाक्यता नव्हती. अशीच परिस्थिती फॉन्टसबाबतही आहे.

- **माझ्याकडे मराठीमध्ये टायपिंगसाठी कोणतेही सॉफ्टवेअर नाही. मी काय करावे?**
  युनिकोडमध्ये टायपिंगची सोय विंडोजमध्येही उपलब्ध आहे. मात्र यात किबोर्ड वापरण्याच्या अनेक मर्यादा आहेत. यात आपल्याला केवळ इन्स्क्रिप्ट हा एकच किबोर्ड वापरता येतो. सोप्या पद्धतीने काम करण्यासाठी आपण "फॉन्टफ्रिडम" हे सॉफ्टवेअर विकत घेउ शकता. यात युनिकोडमध्ये विविध किबोर्डस वापरुन काम करण्याची सोय आहे. यातील "फॉन्टफ्रिडम इंग्लिश फोनेटिक" हा किबोर्ड वापरायला आणि शिकायलाही अत्यंत सोपा आहे. संपूर्ण मदत सॉफ्टवेअर किटमध्ये उपलब्ध आहे. जगभरातील सुमारे साडेचार लाखांपेक्षा जास्त लोक हे सॉफ्टवेअर वापरत आहेत. हे सॉफ्टवेअर केवळ ५०० रुपयात मराठीसृष्टीवर उपलब्ध आहे.

- **विंडोजमध्ये उपलब्ध असलेली मराठी टायपिंगची सोय वापरुन मी लेख लिहू शकतो काय?**
  होय. आपण ही सोय वापरुन मराठीत लेख लिहू शकाल. मात्र यात आपण केवळ इन्स्क्रिप्ट हा एकच किबोर्ड वापरता येतो.

- **मी फॉन्टफ्रिडम गमभन हे सॉफ्टवेअर वापरतो. ते वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  होय. आपल्याकडे फॉन्टफ्रिडम गमभन हे सॉफ्टवेअर असल्यास ते वापरुन आपण मराठीसृष्टीवर लेख लिहू शकाल. खरंतर या सॉफ्टवेअरमध्ये उपलब्ध असलेले किबोर्ड मराठीसृष्टीच्या सर्व फॉर्मसवर कार्यान्वित केलेले आहेत. त्यामुळे बाहेरुन सॉफ्टवेअर चालू करण्याचीही आवश्यकता नाही.

- **मी फॉन्टफ्रिडम मायबोली या सीडीमधील फॉन्टफ्रिडम इंजिन वापरतो. ते वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  फॉन्टफ्रिडम इंजिन वापरुन आपण जुन्या लिगसी पद्धतीच्या फॉन्टमध्ये काम करु शकता. त्यामुळे त्यात टाईप केलेले लेख थेट मराठीसृष्टीवर अपलोड करता येत नाहीत. मात्र आपण असे लेख या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे विविध पद्धतीने आमच्याकडे पाठवू शकता. अन्यथा आमचे "फॉन्टसुविधा" हे सॉफ्टवेअर वापरुन आपले लेख आपण युनिकोडमध्ये कन्व्हर्ट करुन ते पाठवू शकता.

- **मी बराहा हे सॉफ्टवेअर वापरतो. ते वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  बराहा या सॉफ्टवेअरमध्येही युनिकोड आणि लिगसी असे दोन्ही प्रकारचे फॉन्टस आहेत. यातील युनिकोड फॉन्ट इंजिन वापरुन आपण लेख लिहू शकाल. हे सॉफ्टवेअर वापरताना मराठीसृष्टीच्या फॉर्मवरील टायपिंग इजिन सुरु करु नका.

- **मी आकृती हे सॉफ्टवेअर वापरतो. ते वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  आकृती या सॉफ्टवेअरमध्येही युनिकोड आणि लिगसी असे दोन्ही प्रकारचे फॉन्टस आहेत. यातील युनिकोड फॉन्ट इंजिन वापरुन आपण लेख लिहू शकाल. हे सॉफ्टवेअर वापरताना मराठीसृष्टीच्या फॉर्मवरील टायपिंग इजिन सुरु करु नका.

- **मी श्री-लिपी चे सॉफ्टवेअर वापरतो. ते वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  श्री-लिपी या सॉफ्टवेअरमध्येही युनिकोड आणि लिगसी असे दोन्ही प्रकारचे फॉन्टस आहेत. यातील युनिकोड फॉन्ट इंजिन वापरुन आपण लेख लिहू शकाल.  हे सॉफ्टवेअर वापरताना मराठीसृष्टीच्या फॉर्मवरील टायपिंग इजिन सुरु करु नका.

- **मी सी-डॅकचे सॉफ्टवेअर वापरतो. ते वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  श्री-लिपी या सॉफ्टवेअरमध्येही युनिकोड आणि लिगसी असे दोन्ही प्रकारचे फॉन्टस आहेत. यातील युनिकोड फॉन्ट इंजिन वापरुन आपण लेख लिहू शकाल.  हे सॉफ्टवेअर वापरताना मराठीसृष्टीच्या फॉर्मवरील टायपिंग इजिन सुरु करु नका.

- **माझ्याकडे असलेले शिवाजी हे फॉन्ट वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  शिवाजी हे फॉन्टस जुन्या लिगसी पद्धतीचे आहेत. त्यामुळे त्यात टाईप केलेले लेख थेट मराठीसृष्टीवर अपलोड करता येत नाहीत. मात्र आपण असे लेख या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे विविध पद्धतीने आमच्याकडे पाठवू शकता. अन्यथा आमचे “फॉन्टसुविधा” हे सॉफ्टवेअर वापरुन आपले लेख आपण युनिकोडमध्ये कन्व्हर्ट करुन ते पाठवू शकता.

- **माझ्याकडे असलेले कृती-देव हे फॉन्ट वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  शिवाजी हे फॉन्टस जुन्या लिगसी पद्धतीचे आहेत. त्यामुळे त्यात टाईप केलेले लेख थेट मराठीसृष्टीवर अपलोड करता येत नाहीत. मात्र आपण असे लेख या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे विविध पद्धतीने आमच्याकडे पाठवू शकता. अन्यथा आमचे “फॉन्टसुविधा” हे सॉफ्टवेअर वापरुन आपले लेख आपण युनिकोडमध्ये कन्व्हर्ट करुन ते पाठवू शकता.

- **माझ्याकडे असलेले एपीएस हे फॉन्ट वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  एपीएस हे फॉन्टस जुन्या लिगसी पद्धतीचे आहेत. त्यामुळे त्यात टाईप केलेले लेख थेट मराठीसृष्टीवर अपलोड करता येत नाहीत. मात्र आपण असे लेख या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे विविध पद्धतीने आमच्याकडे पाठवू शकता. अन्यथा आमचे “फॉन्टसुविधा” हे सॉफ्टवेअर वापरुन आपले लेख आपण युनिकोडमध्ये कन्व्हर्ट करुन ते पाठवू शकता.

- **माझ्याकडे असलेला चाणक्य फॉन्ट वापरुन मला लेख लिहिता येतील का?**
  चाणक्य हा फॉन्ट जुन्या लिगसी पद्धतीचा आहे. त्यामुळे त्यात टाईप केलेले लेख थेट मराठीसृष्टीवर अपलोड करता येत नाहीत. मात्र आपण असे लेख या पुस्तिकेमध्ये इतरत्र सांगितल्याप्रमाणे विविध पद्धतीने आमच्याकडे पाठवू शकता. अन्यथा आमचे “फॉन्टसुविधा” हे सॉफ्टवेअर वापरुन आपले लेख आपण युनिकोडमध्ये कन्व्हर्ट करुन ते पाठवू शकता.

- **माझ्याकडे वेगवेगळ्या माध्यमांतून आलेले बरेच चांगले लेख आहेत. आपण ते प्रकाशित कराल काय?**
  होय. मात्र त्यांच्या कॉपीराईटसारख्या बाबींची जबाबदारी आपली असेल.

- **या साईटवर काही ठिकाणी आपण इंग्रजी शब्द का वापरले आहेत?**
  मराठीसृष्टी हे मराठी पोर्टल असले तरीही आम्ही मराठीचा अनावश्यक अतिरेक टाळण्याचा प्रयत्न केला आहे. काही इंग्रजी शब्द मराठीत इतके रुळले आहेत की ते जवळपास मराठीच झाले आहेत. इंग्रजी भाषेनेही काही मराठी आणि हिंदी शब्द आपलेसे केले आहेत. त्यामुळे क्लिष्ट मराठी पर्याय वापरण्यापेक्षा मूळ इंग्रजी असलेला मात्र जनमानसात रुळलेला शब्दच वापरणे आम्ही पसंत केले आहे. उदा. माऊस *(उंदीर?)*, मोबाईल *(भ्रमणध्वनी)*, लॅपटॉप *(??)*,टेबल *(??)*, बॅटरी *(विजेरी? विद्युतघट?)*

- **मी इंग्रजी लेख पाठवू शकतो काय?**
  होय. आपण इंग्रजी लेखही पाठवू शकता. परदेशातील नव्या मराठी पिढीला मराठी वाचण्याची सवय नाही. अर्थात त्या पिढीलाही मराठी लिहिता-वाचता यावे ही तर मराठीसृष्टीची इच्छा आहेच. त्यामुळेच या पिढीसाठीही अशा इंग्रजी लेखांचा समावेश आम्ही मराठीसृष्टीवर करत आहोत. लवकरच आम्ही इंग्रजी लेखांसाठीही एक निराळे पोर्टल सुरु करत आहोत.

- **आपल्याकडे भाषांतर करुन घेण्याची सोय आहे का?**
  भाषांतर करण्यासाठी आमच्याकडे काही तज्ज्ञ मंडळी आहेत. त्यांची सेवा त्यांना योग्य तो मोबदला देऊन वापरता येउ शकते. आपणही भाषांतर करत असल्यास आमच्याशी संपर्क साधावा.

- **माझ्याकडे वेगवेगळ्या विषयांवर इंग्रजीमध्ये चांगले लेख आहेत. आपण ते प्रकाशित कराल काय?**
  होय. इंग्रजी लेखांच्या विभागात आपले इंग्रजी लेख प्रकाशित केले जातील.

- **माझे इंग्रजी लेख आपण भाषांतरित करुन घेऊ शकाल काय?**
  भाषांतर करुन घेणे यात काही अडचण नाही. भाषांतर करण्यासाठी आमच्याकडे काही तज्ज्ञ मंडळी आहेत. त्यांची सेवा त्यांना योग्य तो मोबदला देऊन वापरता येउ शकते.
- **आपल्या वेबसाईटवर इंग्रजी लेखांसाठी वेगळा विभाग आहे का?**
  होय. लवकरच आम्ही इंग्रजी लेखांसाठीही एक निराळे पोर्टल सुरु करत आहोत.
- **परदेशातील नवीन पिढीला मराठी व्यवस्थित वाचता येत नाही. त्यांच्यासाठी आपल्याकडे काय उपाय आहे?**
  परदेशातील नव्या मराठी पिढीला मराठी वाचण्याची सवय नाही. अर्थात त्या पिढीलाही मराठी लिहिता-वाचता यावे ही तर मराठीसृष्टीची इच्छा आहेच. या पिढीसाठी इंग्रजी लेखांचा समावेश आम्ही मराठीसृष्टीवर केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनाही लेखन मराठीसृष्टीद्वारे मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याची सोय मराठीसृष्टीवर आहे. या परदेशस्थ मराठी तरुण पिढीला मराठी शिकण्यात मदत करणे आणि मराठीत सोप्या पद्धतीने अभिव्यक्त होण्यासाठी मदत करणे यासाठीही मराठीसृष्टी उत्सुक आहे.

## मराठीसृष्टीच्या लेखकांसाठी तांत्रिक बाबींविषयी प्रश्न

- **मी नोंदणी केली आहे मात्र मला लॉग-इन करता येत नाही**
  आपण आपला लॉग-इन आयडी किंवा पासवर्ड विसरला आहात का? चुकीचा लॉग-इन आयडी किंवा पासवर्ड वापरल्यास आपल्याला लॉग-इन करता येणार नाही. आपला लॉग-इन आयडी आणि पासवर्ड हे केस सेन्सिटिव्ह असतात. म्हणजेच A च्या ऐवजी a असे टाईप केल्यास ते चालणार नाही. आपण जर मराठीत टाईप करण्यासाठी किबोर्ड ड्रायव्हर इंजिन सुरु केले असे आणि पासवर्ड टाईप करत असाल तर आपला पासवर्ड चुकीचा टाईप होईल.
- **मी माझा पासवर्ड विसरलो आहे**
  लॉग-इन विंडोच्या बरोबरच विसरलेला पासवर्ड मिळविण्यासाठी Lost Password ही लिंक आहे. त्यावर क्लिक करुन तेथे असलेल्या फॉर्ममध्ये आपला नोंदणीकृत इ-मेल टाईप करा. आपल्याला एक इ-मेल पाठवले जाईल ज्यात पासवर्ड बदलण्यासाठी लिंक असेल. या लिंकवर जाऊन पण पासवर्ड बदलू शकता.
- **मी माझा लॉग-इन आयडी विसरलो आहे**
  आपण आपला इ-मेल पत्ताच आपला लॉग-इन आयडी म्हणूनही वापरु शकता.
- **माझ्याकडे अनेक इ-मेल आयडी आहेत आणि त्यातला कोणता मराठीसृष्टीसाठी वापरलाय ते मी विसरलो आहे.**
  आपला लॉग-इन आयडी आम्हाला कळवा. आम्ही आपला येथे वापरलेला इ-मेल आयडी कळवू.
- **मला माझा पासवर्ड बदलायचा आहे**
  लॉग-इन विंडोच्या बरोबरच विसरलेला पासवर्ड मिळविण्यासाठी Lost Password ही लिंक आहे. त्यावर क्लिक करुन तेथे असलेल्या फॉर्ममध्ये आपला नोंदणीकृत इ-मेल टाईप करा. आपल्याला एक इ-मेल पाठवले जाईल ज्यात पासवर्ड बदलण्यासाठी लिंक असेल. या लिंकवर जाऊन पण पासवर्ड बदलू शकता.
- **लॉग-इन केल्यावर लेख लिहिण्यासाठी मी कोठे जावे?**
  "नवीन लेख लिहा" या लिंकवर क्लिक करुन आपण आपला लेख लिहिण्यासाठी असलेल्या फॉर्मवर जाउ शकता. इथे लिखाणासाठी सर्व प्रकारच्या सोयी आणि मदत उपलब्ध आहे.
- **मी लेख लिहिला आहे मात्र तो साईटवर दिसत नाही.**
  आपण लेख लिहिल्यानंतर मराठीसृष्टीच्या संपादक मंडळाकडून तो प्रकाशित केला जाईल. यात थोडा वेळ लागण्याची शक्यता असते. आपला पहिलाच लेख असेल तर आपण आपले अकाउंट व्हॅलिडेट करेपर्यंत आपला लेख प्रकाशित होणार नाही. अकाउंट व्हॅलिडेट करण्यासाठीची मदत या प्रश्नोत्तरामध्ये इतरत्र उपलब्ध आहे.
- **मी लिहिलेल्या लेखातील काही मजकूर / संदर्भ मला बदलायचा आहे**
  आपल्याला आपल्या लेखात कोणताही बदल करायचा असल्यास **"लेख संपादित करा"** या लिंकवर क्लिक करा. येथे सूचना दिल्या आहेत.
- **मी लिहिलेला लेख किती वर्गवारींमध्ये ठेवावा यावर काही बंधन आहे का?**
  असे कोणतेही बंधन नाही.
- **लेखाचा सारांश लिहिणे बंधनकारक का आहे?**
  बंधनकारक नाही मात्र सारांश लिहिल्यामुळे वाचकांना लेखाचा विषय कळतो आणि वाचक आपल्या लेखाकडे आकर्षित होऊ शकतो.
- **इंग्रजी सारांश लिहिणे बंधनकारक आहे का?**
  इंग्रजी सारांश लिहिणे बंधनकारक नाही मात्र तसे केल्यास आपला लेख गुगल वगैरे सर्च इंजिनमध्ये दिसू शकतो. (सध्या ही सोय स्थगित केली आहे.)
- **इंग्रजी सारांश लिहिण्याचा फायदा काय?**
  गुगल वगैरेसारख्या सर्च इंजिनमध्ये आपल्या लेखातील एखाद्या शब्दावर सर्च घेतल्यास आपल्याला आपला लेख जर त्या सर्च रिझल्टसमध्ये दिसायला हवा असेल तर इंग्रजी सारांश जरुर लिहा. (सध्या ही सोय स्थगित केली आहे.)

- **लेखामध्ये फोटो देताना त्या फोटोच्या साईझवर काही बंधने आहेत का?**
  आपल्या लेखात अंतर्भूत करण्याचा फोटो "जेपीजी (JPG)" फाईलच्या स्वरुपात असावा, ७५ डिपीआय च्या रिझोल्यूशन मध्ये असावा. फोटो ३०० बाय २२५ या प्रमाणात असावा आणि फोटोची आडवी बाजू ३०० पिक्सेलपेक्षा जास्त नसावी. फोटो ३० किलोबाईटपेक्षा शक्यतो जास्त नसावा अन्यथा आपल्या वाचकांना आपला लेख वाचण्यात त्रास होऊ शकतो.
- **लेखाच्या दरम्यान मला इंग्रजी शब्द/वाक्य लिहायचे असल्यास काय करावे?**
  मराठी आणि इंग्रजी यांच्यामध्ये भाषाबदल करण्यासाठी किबोर्डबरील F9 या बटनाचा वापर करावा. आपण बाहेरचे सॉफ्टवेअर वापरत असल्यास भाषाबदलासाठी त्या सॉफ्टवेअरमध्ये काय सोय आहे त्याप्रमाणे करावे.
- **मी नियमितपणे मराठीसृष्टीवर लेखन करतो. माझे सर्व लेख मला एकाच ठिकाणी बघायचे आहेत.**
  आपण लिहिलेल्या प्रत्येक लेखामध्ये आपले नाव असते. या नावावर क्लिक केल्यास आपल्या सर्व लेखांचे शिर्षक आणि सारांश आपण पाहू शकता आणि त्यावर क्लिक करुन त्या-त्या लेखाच्या पानावर जाऊ शकता.
- **माझ्या लेखांच्या लिंक्स मला मित्रांना पाठवायच्या आहेत**
  आपल्या प्रत्येक लेखाची लिंक त्या-त्या लेखाच्या खाली दिलेली आहे. आपण ही लिंक आपल्या मित्रांना पाठवू शकता. त्याचप्रमाणे आपले सर्व लेख मित्रांना एकत्रितरित्या पहाण्यासाठी आपली लेखक म्हणून लिंक हवी असल्यास आमच्याशी संपर्क साधा.
- **माझ्या लेखांना किती वाचकांनी भेट दिली ते मला पहायचे आहे.**
  यासाठी संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **माझ्या लेखांवर वाचकांच्या काय प्रतिक्रिया आल्या आहेत ते मला पहायचे आहे**
  प्रत्येक लेखावर येणाऱ्या प्रतिक्रिया आमच्या संपादक मंडळाकडून प्रकाशित केल्या जातात. त्या प्रकाशित झाल्यावर त्या-त्या लेखात दिसतात.
- **माझ्या लेखांवर प्रतिक्रिया देणाऱ्या वाचकांना मला इ-मेल पाठवायचे आहे.**
  यासाठी संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **माझ्या लेखासोबत दिसणारे माझे नाव मला बदलायचे आहे.**
  यासाठी संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **मला टोपणनावाने लिखाण करायचे आहे.**
  यासाठी संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **मी वेगवेगळ्या टोपणनावांनी लेखन करतो. मला वेगवेगळे लेख वेगवेगळ्या टोपण नावांनी प्रकाशित करायचे आहेत**
  यासाठी संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **मला लेखकाची माहिती या भागात माझी माहिती द्यायची आहे.**
  आपली माहिती इ-मेलद्वारे आमच्याकडे पाठवा.
- **मला माझे छायाचित्र माझ्या लेखासोबत द्यायचे आहे.**
  आपला फोटो इ-मेलद्वारे पाठवा. फोटो "जेपीजी (JPG)" फाईलच्या स्वरुपात असावा, ७५ डिपीआय च्या रिझोल्यूशन मध्ये असावा आणि फोटोची आडवी बाजू १५० पिक्सेलपेक्षा जास्त नसावी.

## स्वामित्त्वहक्क (कॉपीराईटस) विषयक प्रश्न

- **स्वामित्त्वहक्क म्हणजेच कॉपीराईटसंबंधी आपले काय धोरण आहे?**
  कॉपीराईटच्या बाबतीत आम्ही अत्यंत जागरुक आहोत. कोणत्याही प्रकारचा कॉपीराईट भंग आम्ही सहन करत नाही. एखाद्या लेखात कोणाच्या कॉपीराईटचा भंग झाल्याचे पुराव्यासहित आमच्या निदर्शनाला आणले गेले तर तो लेख लवकरात लवकर पोर्टलवरुन काढण्याची कारवाई आम्ही करतो. मात्र तक्रार करणाऱ्याने पुरेसा पुरावा उपलब्ध करणे आवश्यक आहे. उगाचच कोणत्याही पुराव्याशिवाय आलेल्या तक्रारींना आम्ही महत्त्व देत नाही आणि अशा अशा परिस्थितीत आम्ही आमच्या लेखकांचीच बाजू घेतो.

  कॉपीराईट भंगाच्या कोणत्याही प्रकरणात मराठीसृष्टीची जबाबदारी केवळ संबंधित लेख किंवा फोटो, चित्र, व्हिडिओ वगैरे गोष्टी मराठीसृष्टी पोर्टलवरुन काढून टाकण्यापर्यंतच मर्यादित आहे. अशा प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर कारवाई कोणाकडूनही सुरु झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अशा प्रकारे कॉपीराईटचा भंग करणाऱ्या लेखकावर किंवा व्यक्तीवर असेल.

- **मी लिहिलेल्या लेखाचे स्वामित्त्वहक्क कोणाकडे रहाणार?**
  वाचकांनी स्वत:हून विनामोबदला लिहिलेल्या लेखांचे स्वामित्त्वहक्क वाचकांकडेच असतील. मात्र मराठीसृष्टीच्या इतर वेबसाईटस, नियतकालिके, न्युजलेटर्स, इ-पुस्तके इत्यादिमध्ये हे साहित्य वापरण्याचे अधिकार मराठीसृष्टीकडे असतील. मराठीसृष्टीने आमंत्रित करुन आणि मानधन देउन करुन घेतलेल्या लेखांचे स्वामित्त्वहक्क मराठीसृष्टीकडेच असतील.

- **मराठीसृष्टीवर पाठवल्या जाणाऱ्या लेखांमध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही हे आपण तपासता काय?**
  आमचे संपादक मंडळही कॉपीराईट भंगाच्या बाबतीत नेहमीच दक्ष असते. मात्र इंटरनेटचा पसारा आणि जगभरातल्या कोट्यावधी वेबसाईटस बघितल्या तर कोणता मजकूर, चित्र, फोटो, व्हिडिओ वगैरे कोणत्या साईटवरुन उचललेला आहे काय हे तपासणे साक्षात् ब्रह्मदेवालाही शक्य नाही. एखाद्या लेखात कोणत्याही कॉपीराईटचा भंग झाल्याचे संपादक मंडळाच्या निदर्शनास आले तर त्याबाबत लेखकाला सूचना दिली जाते. अशा प्रकारचा लेख पोर्टलवरुन काढून टाकण्याचीही कारवाई केली जाते.

- **आपल्याकडे दिल्या गेलेल्या लेखात कॉपीराईटचा भंग झाल्यास आपण काय कारवाई करता?**
  एखाद्या लेखात कोणाच्या कॉपीराईटचा भंग झाल्याचे पुराव्यासहित आमच्या निदर्शनाला आणले गेले तर तो लेख लवकरात लवकर पोर्टलवरुन काढण्याची कारवाई आम्ही करतो. कॉपीराईट भंगाच्या कोणत्याही प्रकरणात मराठीसृष्टीची जबाबदारी केवळ संबंधित लेख किंवा फोटो, चित्र, व्हिडिओ वगैरे गोष्टी मराठीसृष्टी पोर्टलवरुन काढून टाकण्यापर्यंतच मर्यादित आहे. अशा प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर कारवाई कोणाकडूनही सुरु झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अशा प्रकारे कॉपीराईटचा भंग करणाऱ्या लेखकावर असते.

- **कॉपीराईटचा भंग होणार नाही यासाठी काय काळजी घेता येईल?**
  आपण मराठीसृष्टीवर लेखन करताना कॉपीराईटसंबंधी नियमांचे व्यवस्थित पालन केल्यास कोणतीही अडचणीची वेळ येणारच नाही. आपल्या लेखासाठी चित्रे, छायाचित्रे निवडताना आपण सजग रहावे. आपल्या लेखांमध्ये काही वेळा इतर वेबसाईटसवरील लेखांचा संदर्भ असल्यास किंवा छायाचित्राचा वापर केल्यास त्याबाबतचे योग्य ते श्रेय त्या त्या वेबसाईटला द्यावे व त्यांचा उल्लेख करावा. काही प्रसंगी बाहेरील वेबसाईटवरील लेखांचा संदर्भ देणे आवश्यक असल्यास त्या लेखाला लिंक्स देण्यास काहीच हरकत नाही कारण इंटरनेट हे असेच एका लिंकमधून दुसरी लिंक अशाच प्रकारे बनले आहे. यामध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही.

- **लेखामध्ये बाहेरील वेबसाईटला लिंक दिली असल्यास कॉपीराईटचा भंग होतो काय?**
  इंटरनेट हे असंख्य लिंक्सने बनलेले एक आश्चर्य आहे. इतर साईटसप्रमाणेच मराठीसृष्टीवरुनही बऱ्याचदा विविध वृत्तपत्रातील बातम्यांना किंवा लेखांना लिंक असतात. अशा लिंक्स देताना त्या बातमीचा किंवा लेखाचा सारांश आम्ही मराठीसृष्टीवर ठेवतो आणि त्यानंतर पूर्ण वाचन करण्यासाठी वाचकाला त्या वेबसाईटवर पाठवतो. यामध्ये कॉपीराईटचा भंग होत नाही.

## ब्लॉग बनविण्याविषयी प्रश्न

- **मला मराठीसृष्टीवर माझा स्वत:चा ब्लॉग बनवायचा आहे. त्यासाठी काय करावे लागेल?**
  आपला ब्लॉग आपण मराठीसृष्टीवर बनवू शकता. आपण त्यासाठी विषय निवडू शकता किंवा संमिश्र विषयावरही ब्लॉग बनवू शकता. यासाठी लागणारी संपूर्ण व्यवस्था आम्ही आपल्याला पुरवतो. यासाठी आमच्याशी संपर्क साधा. संपर्कासाठी पत्ता, इ-मेल वगैरे खाली दिलेला आहे.

- **ब्लॉग बनविण्यासाठी मला काय खर्च येईल?**
  फार खर्च येत नाही. मात्र ब्लॉगस्पॉटवगैरे साईटसप्रमाणे ते मोफतही नाही. केलेल्या कामाच्या वेळेची आणि मराठीत काम करण्यासाठी उपलब्ध केलेल्या अंतर्गत सुविधांपोटी काही प्रमाणात पैसे आम्ही घेतो आणि यात आम्हाला काहीही गैर वाटत नाही.

- **ब्लॉगस्पॉटसारख्या साईटसवर ब्लॉग मोफत बनवता येतो मग आपण त्यासाठी पैसे का घेता?**
  ब्लॉगस्पॉट वगैरेसारख्या साईटसवर ब्लॉग मोफत बनवता येतो. मात्र तिथे मराठीत काम करणे वगैरेसाठी काही मर्यादा आहेत. मुख्यत: ते ब्लॉग्ज इंग्रजी लेखनासाठी वापरले जातात. मराठीसृष्टीवर आम्ही पूर्णपणे मराठीत ब्लॉग बनविण्याच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचप्रमाणे आमच्या प्रचंड मोठ्या मराठी वाचकवर्गापर्यंत आपला ब्लॉग पोहोचविण्यासाठी आम्ही आपल्याला मदत करतो, जे ब्लॉगस्पॉटवगैरेसारख्या ठिकाणी शक्य होत नाही. यासाठीच आम्ही नाममात्र शुल्क आकारतो.

- **माझ्या ब्लॉगसाठी डोमेन नेम मिळेल का?**
  होय. आपण www.yourname.com अशाप्रकारे आपले डोमेननेम मिळवू शकता किंवा yourname.marathisrushti.com असे सब-डोमेनही वापरु शकता.

- **आपल्याकडून ब्लॉग बनवून घेतल्यास मला व्यावसायिक संधी आहेत का?**
  ब्लॉगद्वारे व्यवसायसंधी निश्चितच आहेत आणि भरपूर आहेत. या संधी जाणून घेण्यासाठी आमच्याशी संपर्क साधा. याच विषयावर काही लेख मराठीसृष्टी वेबसाईटवर आहेत ते जरुर वाचा.

- **ऑडिओ ब्लॉग बनविणे शक्य आहे का?**
  होय. आपण आपले लेख आपल्या स्वत:च्या आवाजात ध्वनीमुद्रित करुन पाठवू शकता. आपण विनंती केल्यास आम्ही ते व्यावसायिक कलाकारांकडून ध्वनीमुद्रित करुन घेऊ. यासाठी शुल्क आकारले जाते.

- **व्हिडिओ ब्लॉग बनविणे शक्य आहे का?**
  होय. आपण आपले व्हिडिओ आपल्या कॅमेऱ्यावर किंवा मोबाईलवर बनवून पाठवू शकता. आपले व्हिडिओ जर यु-ट्युबवर असतील तर त्यांची लिंकही पण देऊ शकता. आपल्या व्हिडिओजच्या प्रमोशनसाठी खास योजना आमच्याकडे आहेत. यासाठी आमच्या संपादक मंडळाशी संपर्क साधा.

## व्यावसायिक संधींविषयी प्रश्न

- **मराठीसृष्टीवर कोणत्या व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत?**
  मराठीसृष्टीवर भाषांतर, लेखन, जाहिराती आणणे, मराठीसृष्टीचे मार्केटिंग, प्रॉडक्ट मार्केटिंग अशा प्रकारचे बरेच व्यवसाय उपलब्ध आहेत. आमचे सर्वसमावेशक ब्लॉग इंजिन वापरुन आपण खास विषयांवरील आपला ब्लॉग किंवा वेबसाईटही सुरु करु शकता. यांची माहिती वेळोवेळी मराठीसृष्टी पोर्टलवर प्रकाशित केली जाते. त्यासाठी मराठीसृष्टीवरील लेख नियमितपणे वाचा तसेच आमच्याशी संपर्क साधा.
- **मराठीसृष्टीत नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत का?**
  होय. यासाठी आमच्या संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **मी भाषांतराची सेवा देउ करतो. मराठीसृष्टीला याचा काही उपयोग होईल का.**
- निश्चितच. यासाठी आमच्या संपादक मंडळाशी संपर्क साधा.
- **भाषांतरासाठी मला मराठीसृष्टीच्या माध्यमातून व्यवसाय मिळेल का?**
  होय. यासाठी आपण भाषांतरकार म्हणून आपले नाव आमच्याकडे नोंदवा.
- **मला आपल्या सर्वसमावेशक ब्लॉग इंजिनची माहिती हवी आहे.**
  यासाठी कृपया आमच्याशी संपर्क साधा.

## जाहिरात विषयी प्रश्न

- **आपण या साईटवर जाहिराती दाखवता का?**
  होय. आमच्या वेब पोर्टलवर जाहिराती दाखविल्या जातात.
- **कोणत्या प्रकारच्या जाहिराती या साईटवर दाखवल्या जातात?**
  या वेबसाईटवर वैयक्तिक तसेच संस्थांच्या आणि व्यावसायिक जाहिराती दाखविल्या जातात. जाहिरातींबाबत काही निकष आहेत व ते आमच्या मिडियाकिट मध्ये दिलेले आहेत. कोणत्याही प्रकारच्या प्रतिबंधित उत्पादनांच्या जाहिराती आम्ही दाखवत नाही.
- **आपण या वेबसाईटवर जाहिराती का दाखवता?**
  इंटरनेटवरील सर्व वेबसाईटस या पहाण्यासाठी वाचकांना काहीही पैसे द्यावे लागत नाहीत. जाहिराती हेच आमच्या उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. त्यामुळे जाहिराती दाखविणे अत्यावश्यक होते.
- **आपण नेटवर्कमधून आलेल्या जाहिराती दाखवता का?**
  आम्ही नेटवर्कवरुन आलेल्या जाहिरातीही दाखवितो.
- **मला माझ्या व्यवसायाची किंवा उत्पादनाची जाहिरात इथे करता येईल का?**
  होय. यासाठी आमचा मिडियाकिट वाचण्यासाठी **"मराठीसृष्टीवर जाहिरात करा"** या लिंकवर क्लिक करा.
- **जाहिरात करण्यासाठी काय खर्च येतो?**
  जाहिरातीसाठी वेगवेगळी पॅकेजेस आहेत. त्याची माहिती आमच्या मिडियाकिटमध्ये दिली आहे. साधारणपणे रु.१०००/- पासून ही पॅकेजेस सुरु होतात.
- **आपण व्हिडिओ जाहिराती दाखवता का?**
  होय. आम्ही व्हिडिओ जाहिराती दाखवितो.
- **माझ्या वेबसाईट / ब्लॉगसाठी आपण जाहिराती मिळवून देउ शकाल का?**
  आमच्या वेबसाईटसाठी जाहिराती देणाऱ्या जाहिरातदारांकडून आम्हाला इतरही वेबसाईटसवर जाहिरात करण्याची विचारणा होत असते. आम्ही आपल्या वेबसाईट किंबा ब्लॉगसाठी आपल्याला जाहिराती मिळवून देऊ शकतो.

# मराठीसृष्टी संकेतस्थळ

www.marathisrushti.com

## ठळक वैशिष्ट्ये

- दररोज ८०,००० हून जास्त वाचक
- ४,५०,००० हून जास्त नोंदणीकृत सभासद
- २० वर्षाहून अधिक काळ कार्यरत.
- लवकरच मराठीतील क्र. १ च्या स्थानाकडे वाटचाल
- नेटवर्कची एकूण वाचकसंख्या दररोज २००००० हून अधिक
- २४ तास कार्यरत असलेला संपादकवर्ग
- तांत्रिकदृष्ट्या भक्कम पायावर उभे. वृत्तपत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांनी युक्त
- लेखसंग्रह, मराठी व्यक्ती संदर्भ कोश, खाद्ययात्रा, महासिटीज, मराठी व्हिडिओज, मराठी आडनावकोश असे विविध विभाग
- जगाच्या कानाकोपऱ्यातून येणारा नियमित वाचकवर्ग. वाचकसंख्येत सतत भर
- वाचकांना त्यांच्या प्रतिक्रिया तात्काळ लिहून ऑनलाईन पाठविण्याची सोय
- लाखांहून अधिक मराठी लेखांचा संग्रह असलेले एकमेव मराठी संकेतस्थळ
- लेखांमध्ये दररोजची भर.
- प्रतिथयश साहित्यिकांपासून सामान्य माणसापर्यंत अनेकांचे लेखन उपलब्ध
- आपले मत स्पष्टपणे मांडण्याची सोय. कोणत्याही प्रकारची सेन्सॉरशीप नाही.
- लेखनासाठी अत्यंत सुटसुटीत नियम व अटी
- लेखनासाठी लेखांच्या विषयानुसार २५ हून अधिक विभाग. नवीन वर्गवारी बनविण्याची सोय.
- मराठी व्यक्ती संदर्भ कोश हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प
- जाहिरातदारांना विविध प्रकारच्या जाहिरात संधी
- परिपूर्ण ब्लॉग इंजिन व्यवसायासाठी उपलब्ध
- लेखकांना व्यावसायिक संधी
- स्वेच्छानिवृत्तांसाठी आकर्षक व्यावसायिक योजना
- सेवानिवृत्तांसाठी आकर्षक व्यावसायिक योजना
- पत्रकारांसाठी आकर्षक योजना

संपर्क:

# मराठीसृष्टी डॉट कॉम

चाणक्य, २ रा मजला,
क्लासिक प्लाझाच्या मागे, गोखले रोड,
नौपाडा, ठाणे ४००६०२.

**दूरध्वनी:** (०२२) २५४२ ११८५ / ९८२०३ १०८०३

**इ-मेल :** support@marathisrushti.com

**वेब :** www.marathisrushti.com

WhatsApp : 9820310803

फेसबुक : www.facebook.com/marathisrushti

८ जून २०१७